# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड रविवार । दि. १४ जून २०२६ । अंक ८ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## गुटखा विक्रेत्यांना 'मकोका' लावणार

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कारभार हाती घेताच तुकाराम मुंढे यांनी गुटख्याविरुद्ध जोरदार मोहीम हाती घेतली आहे. गुटखा, निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तंबाखूमिश्रित प्रतिबंधित पदार्थाचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध मकोका लावण्याचे आदेश मुंढे यांनी दिले आहेत. अन्न व औषध प्रशासनातील काही अधिकारी गुटखा विक्रेत्यांना संरक्षण देत असल्याचे आरोप होत आहेत. त्याचीही चौकशी केली जात असून कुणीही अधिकारी यात आढळला तर त्याची गय •> पान २ वर

## धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

**नवी दिल्ली :** लेफ्टनंट जनरल धीरज सेठ आता देशाचे नवे चीफ ऑफ आर्मी स्टाफ अर्थात लष्करप्ररुख असणार आहेत. शनिवारी सरकारने यासंदर्भात घोषणा केली. सेठ ३० जूनपासून या पदाचा कार्यभार स्वीकारतील. राष्ट्रपतींच्या अनुमतीने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची ३० जून पासून चीफ ऑफ आर्मी स्टाफपदी नियुक्ती करण्यात येत आहे. व्हाईस जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून ते पदभार स्वीकारतील असं संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. लेफ्टनंट सेठी सध्या व्हाईस चीफ •> पान २ वर

# माणगाव हादरले! आईच्या हातूनच चिमुकल्यांना विष

■ तिघांचा दुर्दैवी अंत; दोघांची मृत्यूशी झुंज

। सलीम शेख।
। माणगाव ।

माणगाव तालुक्यातील खरवली आदिवासीवाडी येथे शनिवारी (दि.१३) अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. एका विवाहित महिलेने स्वतः विषप्राशन करून आपल्या चार मुलांनाही विष पाजल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला असून एक मुलगा व एक मुलगी गंभीर अवस्थेत उपचार घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, खरवली आदिवासीवाडी येथील धर्मा जाधव यांची पत्नी आशा जाधव यांनी सकाळी थंड पेयामध्ये विष मिसळून प्रथम स्वतः प्राशन केले. त्यानंतर त्यांनी आपल्या मुलांना रवी जाधव, दुर्वा जाधव, नंदिनी जाधव आणि राजश्री जाधव यांनाही ते पेय पाजल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या घटनेत आशा जाधव यांच्यासह



### एका क्षणात उद्ध्वस्त झाले कुटुंब

खरवली आदिवासीवाडीतील या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. आईसह दोन निष्पाप चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत असून या दुर्दैवी घटने मागील नेमके कारण काय, याचा शोध पोलीस घेत आहेत.

दुर्वा जाधव (वय ७) आणि नंदिनी जाधव (वय ४) यांचा मृत्यू झाला. तर रवी जाधव (वय ८) आणि राजश्री जाधव (वय ४) यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. घटनेनंतर सर्वांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे बालरोगतज्ज्ञ व नवजात शिशु विशेषज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर यांनी मुलांची तपासणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्याचा सल्ला दिला.

प्राथमिक माहितीनुसार, मासे मारण्यासाठी वापरण्यात येणारी विषारी गोळी थंड पेयात मिसळून हे कृत्य करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कौटुंबिक वादातून निर्माण झालेल्या नैराश्यामुळे ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज तपास यंत्रणांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांकडून घटनेचा सखोल तपास सुरू आहे.

## वेधक

### जेएनपीएची गगनभरारी

**उरण :** भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने देशातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून आ-पले स्थान कायम राखत जागतिक बँक आणि एस अँड पी ग्लोबल मार्केट इंटेलिजन्स यांनी प्रकाशित केलेल्या कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स २०२५ मध्ये जागतिक स्तरावर २२ वा क्रमांक पटकावला आहे. सीपीपीआय २०२५ अहवालानुसार, जेएनपीएने बंदराच्या एकूण कार्यकालापैकी ७५ टक्के बर्थ ऑक्युपन्सी शेअर नोंदविला आहे. तसेच, स्टॅटिस्टिकल इंडेक्स मध्ये ५८.९ आणि प्रशासकीय इंडेक्समध्ये १३८.० गुण प्राप्त करत •> पान २ वर

### वीज कोसळून ९ जणांचा मृत्यू

**बिहार :** बिहारमधील १२ जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. खगडिया, सहर्षा, मधेपुरा येथे वीज कोसळून पती-पत्नीसह नऊ जणांचा मृत्यू झाला. मान्सूनने गुरुवारी बिहारमध्ये एन्ट्री मारली. ४ जून रोजी केरळमध्ये प्रवेश केल्यापासून मान्सून अवघ्या ८ दिवसांत १७ राज्यांपर्यंत पोहोचला आहे. पुढील दोन दिवसांत तो वेगवेगळ्या राज्यात पोहोचण्याची शक्यता आहे.

### घोट गावात ७ गाईंना विषबाधा

**पनवेल ग्रामीण :** पनवेल तालुक्यातील घोटगावात ५ जुलै रोजी घडलेल्या घटनेत विषबाधेमुळे सात गाई दगावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गावातील बी. एम. पाटील यांच्या गोशाळेतील ४० गुरांपैकी १९ जनावरांना विषबाधेची लक्षणे दिसून आली होती. यापैकी ११ जनावरांवर पंचायत समितीच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत उपचार करण्यात आले, तर सात गाईंचा मृत्यू झाला. मृत जनावरांमध्ये ७ ते ८ महिन्यांच्या ३ गर्भार गईचा समावेश होता विषबाधेमुळे त्यांची अकाली प्रसूती झाली असून वासर दगावल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची •> पान २ वर

### हत्या प्रकरणात महिलेला अटक

**नवीन पनवेल :** लग्नाच्या तगाद्यावरून महिलेची हत्या केलेल्या आरोपीला पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर ११ जून रोजी यातील आणखी एका महिला आरोपीला अटक करण्यात आली. सुरेखा तुलाराम सिंग (भोलेनाथनगर, कौसा, ठाणे) असे या महिला आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने तीला सोमवार १५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यातील आरोपी करण नामदेव पाटील (फडकेपाडा, शिळफाटा, ठाणे) •> पान २ वर

# किनारी असलेल्या 99 गावांसाठी 24 दिवस धोक्याचे

। प्रमोद जाधव।
। जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये यावर्षी २४ वेळा उंच लाटा उसळणार आहेत. १४ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत समुद्रात मोठी भरती येऊन ४.५० मीटर ते ४.८९ मीटर इतक्या उंच लाटा किनारी आदळणार आहेत. समुद्र व खाडी किनारी असलेल्या ९९ गावांना या लाटांचा धोका असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी सर्तक रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलो मीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. मांडवा, रेवस, आक्षी, नागाव, किहीम, वरसोली, अलिबाग, रेवदंडा, बोर्ली, मुरूड, काशीद, दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर अशा अनेक समुद्रकिनारी लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. रायगड जिल्हा •> पान २ वर

### १ जूलैला एनडीआरएफ होणार दाखल

जिल्ह्यामध्ये जूलै महिन्याच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात जोरदार पाऊस पडतो. सावित्री, कुंडलिका, अशा अनेक नद्या उग्र रुप धारण करतात. त्यामुळे पुरपरिस्थिती निर्माण होते. जूलैमध्ये होणाऱ्या अतिवृष्टीपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एनडीआरएफ दलाला पाचारण केले आहे. एक जूलै पासून रायगड जिल्ह्यातील महाड येथे हे दल स्थापित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### पुनर्वसनाचे २५ प्रस्ताव धुळखात पडून

तळीये, जई, कोंडीवते, इरसाल वाडीवर दरड कोसळून जीवीतहानी व वित्तहानी झाली होती. या पार्श्वभूमीवर दरडप्रवण क्षेत्रातील गावांचे भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार २५ दरडप्रवण गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे. मात्र हा प्रस्ताव अद्यापही धुळखात पडून असल्याचे बोलले जात आहे.




## एसकेएनएल बँक घोटाळा

# मुरूड समुद्र किनाऱ्यावरील ६० कोटींची आलिशान मालमत्ता जप्त

■ ईडीची रायगडमध्ये मोठी कारवाई

। मुंबई । वृत्तसंस्था ।

१ हजार ४०० कोटी रुपयांच्या एस कुमर्स नेशनवाइड लिमिटेड (एसकेएनएल) बँक घोटाळा प्रकरणी ईडीने रायगडमध्ये मोठी कारवाई केली आहे. या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार एसकेएनएलचे माजी अध्यक्ष नितीन कासलीवाल यांनी मुरूडच्या समुद्र किनाऱ्यावर ६० कोटी रुपयांची मालकत्ता खरेदी केली होती. ही आलिशान मालमत्ता ईडीच्या इंदूर उपक्षेत्रीय कार्यालयाने जप्त केली आहे.

एस कुमर्स नेशनवाइड लिमिटेडचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन कासलीवाल यांनी या घोटाळ्यातील पैसा पांढरा करण्यासाठी एक मोठे जाळे तयार केले होते. कासलीवाल यांनी विविध बँकांच्या समूहाकडून तब्बल १ हजार ४०० कोटी रुपयांचे कर्ज आणि इतर पतसुविधा घेतली होती. नंतर या कर्जाची परतफेड न करता बँकांची फसवणूक केली. बँकांकडून घेतलेला हा निधी ज्या कारणासाठी घेतला होता, तिथे न वापरता नितीन कासलीवाल यांनी स्वतच्या आणि कुटुंबाच्या नियंत्रणाखालील स्थापन केलेल्या अनेक बनावट कंपन्यांमध्ये परस्पर वळता केला होता. बँकांकडून लाटलेल्या या पैशांचा वापर करूनच मुरुड येथे ही आलिशान जागा खरेदी करण्यात आली होती. त्यामुळेच ही मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याचे ईडीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या घोटाळ्याप्रकरणी ईडीने गेल्या वर्षी २३ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या प्रमाणावर छापे टाकले होते. त्यावेळी कासलीवाल यांच्या परदेशातील ट्रस्ट आणि ऑफशोअर कंपन्यांच्या गुप्त जाळ्याचा पर्दाफाश झाला होता. त्या तपासाच्या आधारे ईडीने यापूर्वी लंडनमधील बकिंगहॅम पॅलेसजवळ असलेली ११९.५५ कोटी रुपयांची हाय व्हॅल्यू मालमत्ता देखील जप्त केली आहे.

यापूर्वी सक्त वसुली संचालनालयाने रायगड जिल्ह्यातील अनेक बड्या धेंडावर कारवाई केल्याचे सर्वश्रुत आहे. यामुळे भ्रष्टाचार करुन रायगड जिल्ह्यात सेकंडहोम म्हणून इमले उभारणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

# हवाई दलाच्या विमानाला अपघात

## ५ जवान शहीद; सह-पायलट गंभीर

। जोरहाट । वृत्तसंस्था ।

आसाममधील जोरहाट येथील मरौरिया एअरफोर्स स्टेशनवर झालेल्या भारतीय वायू दलाच्या मालवाहू विमान अपघातात एक अत्यंत दुर्दैवी आणि मन सुन्न करणारी माहिती समोर आली आहे. शनिवारी (दि.१३) झालेल्या या भीषण दुर्घटनेत वायू दलाचे ५ जवान शहीद झाले. तर विमानाचे को-पायलट गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात तातडीने उपचार सुरू आहेत. अरुणाचल प्रदेशातील आपली मोहीम फत्ते करून हे विमान नियमित उड्डाणाअंतर्गत जोरहाट एअरबेसवर परतत होते, मात्र लँडिंगच्या वेळीच काळाने घाला घातला.



भारतीय हवाई दलाच्या अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान जोरहाट रनवेवर उतरत असतानाच हा भीषण अपघात झाला. हे विमान मुख्य लँडिंग स्ट्रिपवर (धावपट्टी) उतरू शकले नाही, तर एअरबेसच्याच एका गवताळ •> पान २ वर

## गांजा तस्करीप्रकरणी 'मिस केरळ'ला अटक

। मुंबई । प्रतिनिधी ।

हायड्रोपॉनिक गांजा तस्करीच्या आरोपाखाली मिस केरळ म्हणून ओळखलर जाणारी हर्षा सनी हिला सीमा शुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर विभागाने अटक केली आहे. तिच्याकडून ११.८२४ किलो गांजा जप्त केला असून त्याची किंमत सुमारे ११.८२ कोटी इतकी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ॲडव्हान्स पॅसेंजर इन्फॉर्मेशन सिस्टम (एपीआयएस) बसवण्यात आली आहे. त्या यंत्रणेद्वारे प्रोफाईलिंगच्या आधारे एआययूच्या पथकाने हर्षाला ताब्यात घेतले. तिला चौकशीसाठी थांबवण्यात आले. तिच्या ट्रॉली बॅगेची तपासणी केली असता त्यात १२ हिरवट रंगाचा पदार्थ असलेली पाकिटे सापडली.

# गेलच्या सबस्टेशनमुळे भाकरवड संकटात?

## देहेन पुलाच्या कामामुळेही ग्रामस्थांमध्ये भीती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील भाकरवड गावावर संभाव्य पुराचे संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली असून, गेल इंडिया कंपनीच्या सुरू असलेल्या सबस्टेशन प्रकल्पामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलला जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच देहेन गावाजवळ सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामामुळेही भविष्यात मोठ्या प्रमाणावर जलसंकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

भाकरवडचे अध्यक्ष शंकर बाळू पाटील यांनी यासंदर्भात प्रशासनाकडे तक्रार अर्ज सादर केला होता. त्या अनुषंगाने महसूल विभागाने ५ जून २०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. पाहणीदरम्यान भाकरवड येथे गेल कंपनीचे सबस्टेशनचे बांधकाम सुरू असल्याचे •> पान २ वर



■ पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक मार्ग बदलला

■ प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, ग्रामस्थांची मागणी

### 'विकासाच्या नावाखाली गावाला पुराच्या विळख्यात ढकलू नका'

भाकरवड आणि देहेन परिसरातील नागरिकांनी प्रशासनाला साकडे घालत, विकासकामे आवश्यक असली तरी त्यातून गाव, शेती आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड होऊ नये, अशी ठाम भूमिका घेतली आहे. आता प्रशासन आणि संबंधित विभाग या गंभीर इशाऱ्याची कितपत दखल घेतात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

केवळ अमन लॉज ते माथेरान शटल सेवा राहणार सुरु | दुर्घटना टाळण्यासाठी घेतला निर्णय

# १५ जूनपासून माथेरानची राणी पावसाळी सुट्टीवर

। माथेरान । प्रतिनिधी ।

पर्यटकांचे आकर्षण असलेली माथेरानची राणी १५ जूनपासून पावसाळी सुट्टीवर जाणार आहे. पावसाळ्यात दरड कोसळून कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी खबरदारी म्हणून नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सेवा १५ ऑक्टोबरपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. मध्य रेल्वेने याबाबत आदेश जारी केले आहेत. दरम्यान, या चार महिन्याच्या कालावधीत अमन लॉज ते माथेरानदरम्यानची शटल सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे.

नेरळ ते माथेरान रेल्वे सुमारे २१ किलोमीटरचा घाटमार्ग असून या मार्गावर अनेक डोंगरकडे, खोल दऱ्या आणि संवेदनशील उतार आहेत. पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे दरडी कोसळणे, झाडे पडणे किंवा रेल्वे मार्गावर माती वाहून येण्याचा धोका वाढतो. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत दरवर्षी मान्सून काळात ही सेवा तात्पुरती बंद ठेवली जाते. यंदा पावसाचे आगमन अपेक्षेपेक्षा उशिरा झाले असले तरी मध्य रेल्वेने नियमानुसार १५ जूनपासून नेरळ-माथेरान मिनी ट्रेन बंद ठेवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. त्यामुळे सोमवारपासून माथेरानची राणी सुट्टीवर असणार आहे.



### निसर्गाचा आनंद घेता येणार

पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी अमन लॉज ते माथेरान आणि माथेरान ते अमन लॉजदरम्यान शटल सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. या सेवेमुळे माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पावसाळ्यातील धुक्याने वेढलेले डोंगर, हिरवाईने नटलेले निसर्गरम्य वातावरण आणि विविध पर्यटनस्थळांचा आनंद घेता येणार आहे. रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शटल सेवा नियमितपणे धावणार असून पर्यटकांनी प्रवासापूर्वी रेल्वेच्या अधिकृत वेळापत्रकाची माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




# आखाती युद्धामुळे कशेडी घाटात काम रखडले

## • जय भारत ठेकेदार कंपनीचा दावा • पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न केल्यास आंदोलनाचा इशारा



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा महामार्गावरील जुन्या कशेडी घाटातील २००५ पासून खचणाऱ्या १०५ मीटरच्या डेंजर झोन रस्त्यावर १५ मेपर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित असताना अमेरिका इराण युद्धामुळे कशेडी घाटातील डेंजर झोनचे काम रखडले असल्याचा दावा जय भारत ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी केला आहे.

आगामी पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण न केल्यास स्थानिकांकडून उग्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे अध्यक्ष शैलेश पालकर यांनीदेखील कोकणातील पत्रकारांनी चौपदरीकरणाच्या आंदोलनाचा एल्गार पुकारलेल्या कशेडी घाटाच्या रस्त्यासाठी पुन्हा एकवटण्याचे आवाहन कोकणातील पत्रकारांना केले आहे. दरम्यान, मागील वेळी प्रमाणे खचणारा डेंजर झोनचा भराव करण्यासाठी दोनशे मीटर अंतरावर दगडखाणीत स्फोटकांचा वापर झाल्याने अतिवृष्टी काळात जुन्या कशेडी घाटातील रस्त्यावर डोंगरातून भुस्खलन मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यासंदर्भात जय भारत ठेकेदार कंपनीतर्फे अमित चंदनानी यांनी अमेरिका आणि इराण दरम्यानच्या युध्दपरिस्थितीमुळे आवश्यक इंधन डिझेल व जिओसिन्थेटीक कच्च्या मालाचा मोठ्या प्रमाणात पुरवठा झाला नाही. महामार्ग बांधकाम विभागाच्या निर्देशानुसार सर्व बांधकाम सामुग्री खचणाऱ्या रस्त्याच्या ठिकाणी आणण्यासाठी अतिशय कष्ट व विलंब झाला. जिथपर्यंत कातळ आहे तिथपर्यंत दरवर्षी आणणारा डेंजर झोनचा १०५ मीटरचा कशेडी घाटातील रस्ता खोदून काढला. यावेळी दरवेळी केलेल्या डांबरीकरणाचे सुमारे १२ ते १५ बीटूमीन रस्त्याचे थर दिसून आले. आयआयटी मुंबईच्या मार्गदर्शनाखाली तसेच तंत्रज्ञांनी दिलेल्या निर्देशानुसार झिंक व अल्युमिनियम कोटेड जाळ्यांचे नेटवर्क तयार करून त्यामध्ये हार्ड रॉक्सचे गॅबियन स्ट्रक्चर करून त्याला डोंगरातील कातळात १५ ते २० ड्रील करून त्यामध्ये ३० मीमी स्टील बार फिट करण्यात आले असल्याने ४५ अंशात्मक कातळातून हे गॅबियन स्ट्रक्चर सुमारे १० ते १५ वर्षे निसटणार नाही. परिणामी, यावर्षीचे डेंजर झोनचे काम कायमस्वरूपी टिकाऊ असेल, अशी माहिती दिली. याठिकाणी नैसर्गिक भूजलस्त्रोत असून यातील पाणी अतिक्षारयुक्त असल्याने स्टील गंजून नष्ट होत असे. मात्र झिंक व अल्युमिनियम कोटेड जाळ्या या क्षारयुक्त भुजलामुळे गजणार नसल्याचे जय भारत ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी सांगितले.

यावेळी कोंढवीचे सुहास मोरे यांनी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, महाविद्यालय, बाजारहाट यासाठी १२ गावांसह २८ वाड्यावस्त्यांचे जनजीवन या डेंजर झोनचे काम रखडल्याने रस्ता संपर्क तुटून बाधित होणार आहे. जय भारत ठेकेदार कंपनीतर्फे या जनतेसाठी खासगी प्रवासी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी स्थानिकांच्या वतीने करून पावसाळ्यात रस्ता बंद ठेवण्याची वेळ ओढवली तर उग्र आंदोलनाचा इशारा यावेळी दिला. याप्रसंगी पळचिलचे उमेश मोरे व सनी जाधव आदींनी उपस्थित राहून जय भारत ठेकेदार कंपनीतर्फे अमित चंदनानी यांना स्थानिकांच्या गैरसोयीबद्दल कडक शब्दात सुनावले. दरम्यान, डेंजर झोनपासून दोनशे मीटर अंतरावर दगडखाणीत स्फोटकांचा वापर करून गॅबियन स्ट्रक्चर मध्ये दगडांचा भराव केला जात आहे. या स्फोटकांच्या स्फोटामुळे माती आणि कातळातील एकजिनसीपणा नष्ट होऊन अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात अनेक ठिकाणी भूस्खलनाचा धोका निर्माण झाला असून नजीकच्या काळात अशा प्रकारच्या आपत्तीला जय भारत ठेकेदार कंपनी जबाबदार राहील, असा इशारा स्थानिकांनी दिला.

या डेंजर झोनची पाहणी छगन भुजबळ यांनी पहिल्यांदा तर त्यानंतर खा. सुनील तटकरे, खासदार डॉ. निलेश राणे, बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, शिवेंद्रसिंहराजे भोसले आदींनी केल्याची जाणीव जय भारत ठेकेदार कंपनीच्या अमित चंदनानी यांना देण्यात आली.

# ग्राहकांचा स्मार्ट मीटरला विरोध कायम

**। कळंबोली । प्रतिनिधी ।**

राज्यभरात स्मार्ट मीटर बसविण्याच्या निर्णयाला अनेक ठिकाणी नागरिकांकडून विरोध होत असतानाच महावितरणकडून कळंबोली येथील ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याबाबत पूर्वसूचना देणारे संदेश पाठविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

महावितरणकडून ग्राहकांच्या मोबाईलवर पाठविण्यात आलेल्या संदेशानुसार, भारत सरकारने १७ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेनुसार ज्या ग्राहकांकडे अद्याप स्मार्ट मीटर बसविण्यात आलेले नाहीत, त्यांचे विद्यमान वीजमीटर ४८ तासांनंतर बदलून स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत. हा संदेश मीटर बदलण्याबाबतची पूर्वसूचना असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

संदेशात स्मार्ट मीटरचे विविध फायदेही नमूद करण्यात आले आहेत. यामध्ये मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक बिलिंग, मोबाईल ॲपद्वारे वीज वापर आणि बिलावर नियंत्रण, सौरऊर्जेच्या उपलब्ध वेळेत घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८५ पैशांची सवलत तसेच मीटर बदलण्याची प्रक्रिया पूर्णपणे मोफत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मात्र, अनेक ठिकाणी नागरिक, सामाजिक संघटना तसेच विविध राजकीय पक्षांनी स्मार्ट मीटर प्रकल्पाविरोधात भूमिका घेतली आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजदर वाढण्याची भीती, प्रीपेड प्रणाली लागू होण्याची शक्यता आणि ग्राहकांवरील आर्थिक भार वाढेल, अशा कारणांमुळे विरोधकांकडून आंदोलन करण्यात येत आहे.

अशा परिस्थितीत महावितरणकडून थेट ग्राहकांना संदेश पाठवून मीटर बदलण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ग्राहकांनी या संदेशाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

# पादत्राणे व्यावसायिकांना गटई स्टॉलचे वाटप

**। रायगड । प्रतिनिधी ।**




अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील पादत्राणे दुरुस्ती व्यवसायिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक व्यवसाय करता यावा या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या गटई स्टॉल योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १० पात्र लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वितरण करण्यात आले.

मुलांचे शासकीय वसतिगृह, वरसोली (अलिबाग) येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी शासनाच्या १०० टक्के अनुदान योजनेअंतर्गत स्टॉल उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रत्येक लाभार्थ्याच्या बँक खात्यात रु. ५ हजारांची आर्थिक मदत जमा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी गटई स्टॉलधारकांचे अभिनंदन केले. तसेच व्यवसाय अधिक सक्षम व आधुनिक करण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत उपलब्ध प्रशिक्षणांचा लाभ घ्यावा, तसेच व्यवसाय विस्तारासाठी विश्वकर्मा कर्जयोजना आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

शासनाच्या या उपक्रमामुळे रस्त्याच्या कडेला उन्हात, वाऱ्यात आणि पावसात बसून सेवा देणाऱ्या चर्मकार समाजातील व्यावसायिकांना सुरक्षित व्यवसायासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून त्यांच्या आर्थिक उन्नतीलाही चालना मिळणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण) सुनिल जाधव तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# रसायनीतील हिल इंडिया कंपनीच्या सेवानिवृत्त कामगारांची बैठक

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

दांडफाटा येथील टाक देवी येथे रसायनीतील हिल इंडिया कंपनी सेवावृत्त कामगारांची बैठक पार पडली. सदर बैठकीत चार वर्षा पासून उपादान न मिळाल्याने शिवाय कामगार ऑथॉरिटीने १० टक्के व्याजासह रक्कम देण्याचे आदेश होऊन तसेच रिकव्हरी आदेश होऊनही अद्याप काहीच हाती न लागल्याने कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

याव्यतिरिक्त रजेचे रोखीकरण, वैद्यकीय सवलत असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत .मात्र कंपनी व्यवस्थापन गांभीर्याने घेत नाही तसेच शासनही दखल घेत नाही त्यामुळे आंदोलन केल्या शिवाय न्याय मिळणार नाही. अशा संतप्त भावना व्यक्त केल्या. ४ ऑगस्ट २०२६ पासून कंपनी गेटवर साखळी उपोषण करून आठवड्यात योग्य न्याय न दिल्यास आत्मदहन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

लवकरच संबंधितांना नोटीसा देण्यात येतील यासाठी सर्वांनी एकत्रित राहून लढूया असा संकल्प केला. तसेच कामगार ऑथॉरिटी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान केला म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल असाही ठराव घेण्यात आला.



# महेंद्र घरत यांचा सत्कार

**। उरण । प्रतिनिधी ।**




आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत हे आंतरराष्ट्रीय कामगार शिखर परिषदेसाठी आपल्या वाढदिवसासह सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करून जिनेव्हा येथे गेले होते. कारण तेथे जगातील कामगारांच्या हक्कांसाठी कायदे बनविले जातात. ही संधी महेंद्र घरत यांना दुसऱ्यांदा मिळाली. साहजिकच वाढदिवसानिमित्त त्यांना प्रत्यक्ष भेटून अनेकांना शुभेच्छा देता आल्या नाहीत. महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी महेंद्र घरत हे वहाळच्या साई मंदिरात अन्नदान करतात.

त्यामुळे गुरुवारी (दि.११) महेंद्र घरत हे साई मंदिरात आरती आणि अन्नदान उपक्रमासाठी उपस्थित होते. त्यावेळी साई मंदिर वहाळतर्फे त्यांचा आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत सहभागी होण्याचे भाग्य लाभले त्याबद्दल आणि वाढदिवसानिमित्त मो. का. मढवी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच एमटीएचएलचे चिफ रेसिडेंट इंजिनियर रतनलाल देशमाने यांचाही यथोचित सन्मान साई मंदिरतर्फे करण्यात आला.

# अनोळखी महिलेचा मृतदेह सापडला

**नवीन पनवेल :** पनवेल तालुका पोलिसांना मुंजेश्वरी मैदान, खेरणे गाव या ठिकाणी ४५ ते ५० वर्षीय अनोळखी महिलेचा मृतदेह सापडून आला आहे. पोलीस या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

ही महिला अंगाने सडपातळ असून डोक्याचे केस काळे आहेत. चेहरा उभट आणि रंगाने सावळी असून उंची पाच फूट आहे. तिने काळ्या रंगाचा फुलाफुलांचा गाऊन परिधान केला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास अर्चना कुदळे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा.

## पान १ वरून

### धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

ऑफ आर्मी स्टाफ पदावर कार्यरत आहेत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. लेफ्टनंट सेठ हे पुण्याजवळच्या खडकवासला इथल्या नॅशनल डिफेन्स अकादमीचे विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये ते लष्करात रुजू झाले. संघटनात्मक काम, क्षमता विकास प्रशिक्षण, डावपेचात्मक असा ४० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव सेठ यांच्याकडे आहे.

सेठ यांनी विविध स्वरुपाच्या मोहिमांचं नेतृत्व केलं आहे. वाळवंटी भागात तसंच भारत-पाकिस्तान सीमेचं रक्षण करणाऱ्या वेस्टर्न थिएटर कमांडचं नेतृत्व त्यांनी केलं आहे. लेफ्टनंट जनरल म्हणून त्यांनी सुदर्शन चक्र कॉर्प्स या भारतीय लष्करातील अतिशय प्रतिष्ठेच्या चमूचं नेतृत्व केलं. राजधानी दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय लष्करी कार्यक्रमांचं समन्वयन तसंच संचालन त्यांच्या नेतृत्वात झालं होतं. आर्मी कमांडरपदी नियुक्त सेठ यांनी सदर्न वेस्टर्न कमांड आणि सदर्न कमांडची सूत्रं हाताळली. अडीच वर्षाहून अधिक काळ देशाच्या अत्यंत निर्णायक आणि महत्त्वाच्या विभागांची दुहेरी जबाबदारी सांभाळण्याचा मान सेठ यांना मिळाला होता.

लष्कराच्या आधुनिकीकरणासंदर्भात सेठ यांनी घेतलेले निर्णय मोलाचे ठरले आहेत. लष्कराच्या मुख्यालयात कार्यरत असताना भारतीय लष्कर अधिकाअधिक तंत्रसुसज्ज, आधुनिक होईल यासंदर्भात त्यांनी पुढाकार घेतला. युद्धभूमीवर तसंच सीमेनजीकच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सैनिकांना काय आवश्यक आहे याची जाण असलेल्या सेठ यांनी काळाच्या पुढचा विचार करून निर्णय घेतले. लष्करी शिक्षण कालसुसंगत असावं यासाठीही त्यांनी हिरिरीने काम केलं आहे. नॅशनल डिफेन्स कॉलेजचे विद्यार्थी असलेले सेठ, पॅरिस इथल्या कमांड अँड स्टाफ कोर्सचाही भाग होते.

### गुटखा विक्रेत्यांना ‘मकोका’ लावणार

केली जाणार नाही. त्याच्यावरही कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असा इशाराही मुंढे यांनी यावेळी दिला.

तुकाराम मुंढे यांनी शनिवारी (दि.१३) पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. मुंढे यांनी गेल्या महिनाभरात राज्यभरात धाडी घालून ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल केले. त्यानंतरही गुटखा विक्री सुरूच असल्याची माहिती हाती आल्याने त्यांनी अधिक कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. गुटखा विक्री ही संघटित गुन्हेगारी असल्याने उत्पादकापासून विक्रेत्यापर्यंत सर्वांविरुद्ध थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत मकोका कारवाई करण्याचे निर्देश मुंढे यांनी दिले. मकोका लावण्यापूर्वी आरोपीचा इतिहास पडताळला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### किनारी असलेल्या ९९ गावांसाठी २४ दिवस धोक्याचे

पोलीस दलाच्या अखत्यारित सुमारे ११ सागरी पोलीस ठाणे आहेत. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेने निम्मे नागरिक समुद्र आणि खाडी किनारी राहणारे आहेत. जिल्ह्यामध्ये १३२ पुरप्रवण गावांचा समावेश आहे. त्यामध्ये समुद्रकिनाऱ्यावरील ९९ गावे आहेत. जिल्ह्यामध्ये १४ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत समुद्राला मोठी भरती येणार आहे. या कालावधीत किनारी उंच लाटा उसणार आहेत. १२ दिवसामध्ये ४.५० मीटर ते ४.६८ मीटर उंच तसेच आणखी १२ दिवसात ४.७३ ते ४.८९ मीटर उंच लाटा येणार आहेत. जून महिन्यात १४ ते १९ या सहा दिवसांच्या कालावधीत ४.६४ मीटर ते ४.८७ मीटर उंच लाटा किनारी धडकणार आहेत. जुलै महिन्यात १३ ते१८ जूलै या सहा दिवसाच्या कालावधीत ४.५३ ते ४.८९ मीटर उंच लाटा येणार आहेत. ऑगस्ट महिन्यात १२ ते १६ ऑगस्ट या पाच दिवसांच्या कालावधीत ४.५० ते ४.८३ मीटर उंत लाटा असणार आहेत. सप्टेंबर महिन्यामध्ये १० ते १३ सप्टेंबर या कालावधीत ४.५१ ते ४.६५ मीटर उंच तसेच २८ ते३० सप्टेंबर या कालावधीत ४.५१ ते ४.५९ मीटर उंच लाटा येणार आहेत. दिवसा २० दिवस आणि मध्य रात्री चार दिवस या लाटा येणार असून त्यांची वेळ ११.१४ वाजल्यापासून दुपारी ३ वाजून ३२ मिनीटांच्या दरम्यान असणार आहेत. समुद्रकिनारी राहणाऱ्या नागरिकांना या लाटांचा धोका असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहवे असे आवाहन करण्यात आले आहे.

### गेलच्या सबस्टेशनमुळे भाकरवड संकटात?

निदर्शनास आले.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ज्या ठिकाणी सबस्टेशन उभारले जात आहे, त्या परिसरातून अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या वाहून जात होते. मात्र, प्रकल्पाच्या कामामुळे हा प्रवाह बदलण्यात येत असून त्यामुळे मुसळधार पावसाच्या काळात पाणी गावात घुसण्याची आणि पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः गावातील रस्त्यावर पाणी साचल्यास संपर्क व्यवस्था खंडित होऊन नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.स्थळ पाहणीवेळी गेल कंपनीचे संपर्क अधिकारी काणेकर यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी सबस्टेशनचा आराखडा प्रशासनाकडे सादर केला असला तरी ग्रामस्थांच्या शंका आणि संभाव्य धोक्याबाबत अद्याप समाधानकारक उपाययोजना झालेल्या नसल्याची भावना व्यक्त होत आहे.दरम्यान, याच मार्गावरील देहेन गावाजवळील जुना पूल मोडकळीस आल्याने नव्या पुलाचे बांधकाम सुरू आहे. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, जुन्या पुलामध्ये चार गाळे (वॉटर ओपनिंग) असताना नव्या पुलात केवळ तीन गाळे ठेवण्याचा प्रस्ताव आहे. सागरगड माची परिसरातून मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी खाली येते. त्यात भरतीच्या काळात नदीचे पाणीही वाढल्यास पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन गाव आणि शेती क्षेत्रात पाणी शिरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित यंत्रणांना तातडीने तांत्रिक पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात उद्भवणाऱ्या पूरस्थितीची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांवर राहील, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

### हवाई दलाच्या विमानाला अपघात

भागात त्याची क्रॅश लँडिंग झाली. विमान वेगाने आदळल्यामुळे त्याचा मोठा स्फोट झाला. अपघात इतका भयानक होता की, एअरबेसच्या आवारातच विमानाने पेट घेतला आणि विमानाचे तुकडे झाले. आग लागल्याचे समजताच एअरबेसवरील आपत्कालीन पथक आणि फायर ब्रिगेडने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, आगीची तीव्रता जास्त असल्याने वायू दलाच्या ५ जवानांना वाचवण्यात अपयश आले आणि ते शहीद झाले.या भीषण आगीतून को-पायलटला अत्यंत गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात यश आले असून, सध्या त्यांच्यावर लष्करी रुग्णालयात शर्थीचे उपचार सुरू आहेत.

हा अपघात नेमका तांत्रिक बिघाडामुळे झाला की, हवामानातील बदलामुळे, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतीय हवाई दलाने या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली असून, अपघाताच्या सखोल तपासासाठी कोर्ट ऑफ इंक्वॉयरीचे म्हणजेच उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

### जेएनपीएची गगनभरारी

जेएनपीएने जगातील कंटेनर बंदरांमध्ये २२ वा क्रमांक मिळविला आहे.अहवालात पुढे नमूद करण्यात आले आहे की, २०२० ते २०२५ या कालावधीत सर्वाधिक सुधारणा नोंदविणाऱ्या जगातील अव्वल २० बंदरांमध्ये जेएनपीएने १४ वे स्थान मिळविले आहे. या कालावधीत जेएनपीएच्या क्रमवारी गुणांकनात ३२ गुणांची वाढ झाली असून,२०२० मधील ६६ गुणांवरून २०२५ मध्ये ते ९८ गुणांपर्यंत पोहचले आहे. या लक्षणीय सुधारणेमुळे कामगिरीत सर्वाधिक प्रगती करणाऱ्या जागतिक बंदरांमध्ये जेएनपीएने १४ वे स्थान पटकावले आहे.

भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून जेएनपीएला पुन्हा मिळालेली मान्यता आणि सीपीपीआय २०२५ मध्ये सुधारलेले जागतिक स्थान हे कार्यक्षमता विस्तार, जहाजांच्या टर्नअराउंड वेळेत सुधारणा आणि बंदराधारित लॉजिस्टिक्स अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने करण्यात आलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. हा सन्मान संपूर्ण पोर्ट समुदायासाठी अभिमानाचा विषय असला, तरी जागतिक स्तरावरील सर्वोत्तम बंदरांच्या बरोबरीने स्वतःचे सातत्याने मूल्यमापन करत कामगिरी अधिक उंचावण्याची जबाबदारीही त्यातून वाढते. या उल्लेखनीय यशासाठी मी आमचे सर्व टर्मिनल ऑपरेटर्स, शिपिंग लाईन्स, लॉजिस्टिक्स भागीदार, सीमाशुल्क विभाग, कर्मचारी आणि जेएनपीए परिसंस्थेशी निगडित सर्व भागधारकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो, असे मत जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाळ यांनी केले आहे.

### घोट गावात ७ गाईंना विषबाधा

माहिती मिळताच जिल्हा परिषद पशुवैद्यकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन बाधित जनावरांवर उपचार केले.

दरम्यान, मृत गाईचे शवविच्छेदन करण्यात आले नसल्याचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. जनावरांच्या मालकाकडून अधिकृत तक्रार प्राप्त झाली नसल्याने शवविच्छेदनाची प्रक्रिया करण्यात आली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या घटनेनंतर परिसरातील सिडकोच्या डम्पिंग ग्राउंडकडे संशयाची सुई वळली आहे. डम्पिंग ग्राउंडची सुरक्षा भिंत काही ठिकाणी पडल्यामुळे कचरा शेजारील पाणवठ्यात जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे पाणी प्रदूषित होऊन ते पाणी पिल्याने जनावरांचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

मात्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या शक्यतेला नकार दिला आहे. घटनेची दखल घेत परिसरातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. परिसरातील प्रदूषणामुळे वारंवार जनावरे दगावत आहेत, मात्र प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

### हत्या प्रकरणात महिलेला अटक

याचे आणि अटक करण्यात आलेल्या सुरेखा सिंग महिला आरोपीचे प्रेम संबंध होते. तर दुसरीकडे हत्या झालेली महिला अनिता देवी राजभर (३०) ही देखील करण पाटील याच्यावर प्रेम करत होती. सहा एप्रिल रोजी करण आणि अनिता हे दोघे शिळफाटा जवळील लॉजवर गेले आणि त्यावेळी या महिलेने करण पाटील याच्यासोबत लग्न करण्यसाठी तगादा लावला. यावेळी करणने तिची समजूत काढली. मात्र तिने ऐकले नाही. त्यानंतर त्याने एका निर्जनस्थळी नेऊन तिच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार केला. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली आणि तिचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपीने त्याची प्रेयसी सुरेखा सिंग हिला बोलावून घेतले आणि त्या दोघांनी तिचा मृतदेह गाडीत घालून पनवेल तालुक्यातील चिंचवली वाकडी रस्त्याच्या बाजूला टाकून दिला. यावेळी तिच्या डोक्यावर आरोपी करण पाटील याने दोन दगड देखील टाकले. काही वेळाने करण पाटील याने पेट्रोल आणून तिची ओळख पटू नये म्हणून तिला जाळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा आरोपी करण याने मृतदेह टाकलेल्या ठिकाणी येऊन पाहणी केली आणि तो निघून गेला. पोलिसांनी त्याची प्रेयसी सुरेखा हिला अटक केली आणि गुन्ह्यात वापरलेला लोखंडी रॉड आणि चार चाकी गाडी देखील जप्त केली.

# पाऊस लांबणीवर; बळीराजाचा जीव टांगणीवर

**धाटाव :** जून महिना निम्मा होऊनही पावसाने दडी मारल्यामुळे कोकणातील बळीराजाचा जीव कमालीचा टांगणीवर लागला आहे. दरवर्षी मृग नक्षत्र सुरू होताच शेतात पेरण्यांची लगबग सुरू होते,मात्र यंदा मान्सून लांबणीवर पडल्याने शेतकरी चिंतेच्या गर्द सावटाखाली आहेत.कृषी विभागाने दिलेल्या सल्ल्यानुसार, पुरेसा पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरण्या करू नयेत; अन्यथा दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.अनेक भागात पाण्याअभावी जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनू लागला आहे. डोंगरमाथ्यावरील ग्रामीण भागात विहिरींनी तळ गाठला आहे.बहुतांशी धरणातून पाण्याचा साठाही मुबलक राहिला असून पाणीपातळीत कमालीची घट झाल्यामुळे झाडांना, गुरांना पाणी मिळणार कसे हा मोठा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

# शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धाव

**पाली /बेणसे :** सुधागड तालुक्यात असलेल्या मौजे चिवे गावात जमीन फेरफार नोंदीवरून एक मोठा वाद समोर आला आहे. संबंधित खातेदार व शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना किंवा कायदेशीर नोटीस न बजावता, जमिनीची आकारफोड मंजूर केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अन्यायाविरुद्ध संतप्त शेतकऱ्यांनी थेट सुधागड-पालीच्या तहसीलदारांकडे लेखी हरकत अर्ज दाखल केला असून, महसूल प्रशासनाच्या या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शेतकऱ्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर जमिनीची आकारफोड करताना किंवा फेरफार नोंद मंजूर करताना महसूल विभागाकडून मूळ जमीनधारकांना अथवा कोणत्याही हितसंबंधीयांना साधी नोटीस बजावण्यात आली नाही, की कोणतीही माहिती दिली गेली नाही. नियमानुसार अशा प्रक्रियेत सर्व संबंधित पक्षांना ऐकून घेणे बंधनकारक असते. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत संशयास्पद आणि नियमबाह्य पद्धतीने राबवली गेल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.या प्रकरणामुळे सुधागड तालुक्यातील महसूल विभागाच्या पारदर्शकतेवर आणि कामकाजावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या गंभीर तक्रारीवर तहसीलदार (पाली-सुधागड) नेमकी काय भूमिका घेतात आणि शेतकऱ्यांना न्याय मिळतो का, याकडे संपूर्ण चिवे परिसरासह तालुका व जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मलनि:सारण प्रकल्प अद्याप अपूर्णच

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**माथेरान शहरात मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानंतर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे मलनिस्सारण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे आता तेथील दोन प्रकल्प कार्यान्वित करून पाहिल्यानंतरच अन्य प्रकल्पांची कामे करण्यात यावीत, असा निर्णय पालिकेच्यावतीने बोलावलेल्या विशेष सभेत घेण्यात आला. दरम्यान, माथेरान शहरात सहा प्रकल्प राबवले जात असून, कामाची गती आणि दर्जाहीन कामे यामुळे सहा पैकी चार प्रकल्पांची कामे थांबवण्यात आली आहेत.**



- **ठेकेदार कंपनीकडून दर्जाहीन काम**
- **अन्य प्रकल्प थांबवण्याचा निर्णय**

माथेरान शहरातील सांडपाणी दरीमधून पाण्याचे स्रोत असलेल्या धरणामध्ये जात होते. त्यामुळे राज्य मानव हक्क आयोगाच्या निर्देशानंतर राज्य सरकार कडून मलनि:सारण प्रकल्प माथेरान शहरात मंजूर झाला होता. शहराची भौगोलिक रचना लक्षात घेऊन सहा वेगवेगळ्या ठिकाणी मलनिस्सारण प्रकल्प उभारण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून मंजुरी देण्यात आली होती. शहरातील सर्व १२५० कुटुंबांच्या घरातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी जंगलात तसेच गार्डनमध्ये वापरण्याची ही योजना आहे. गेली तीन वर्षे या प्रकल्पांची कामे सुरू असून, त्यातील दोन ठिकाणी तर प्रकल्पाचे काम देखील सुरू झालेले नाही. त्यात सांडपाणी वाहून नेण्यासाठी टाकण्यात आलेली पाइप लाइन आणि गटारांच्या कामाच्या निकृष्ठ दर्जामुळे हा प्रकल्प पूर्ण झाला तरी या प्रकल्पामुळे शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया होईल याची शाश्वती नाही. त्यामुळे शहरातून मोठ्या प्रमाणावर नागरिक प्रकल्पाच्या कामावर नाराजी व्यक्त करीत आहेत.

ही बाब लक्षात घेता माथेरान नगरपरिषदेने या प्रकल्पाचे ठेकेदार, नगरपरिषदेने नेमलेली तांत्रिक एजन्सी आणि सर्व लोकप्रतिनिधी यांची बैठक आयोजित केली होती. थेट नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला उप नगराध्यक्ष संतोष शेलार, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि सर्व नगरसेवक उपस्थित होते. यावेळी प्रकल्पाच्या कामाची माहिती ठेकेदार आणि पीएमसी यांच्याकडून देण्यात आल्यानंतर अनेक नगरसेवकांच्या संयमाचा बांध फुटला. माजी नगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक मनोज खेडकर, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, विरोधी गटाचे नगरसेवक सचिन दाभेकर यांनी कामाच्या दर्जा आणि चालढकलपणा याविरुद्ध जोरदार आवाज उठवला. चर्चेनंतर अखेर शहरातील पाच आणि सहा नंबरचे मलनि:सारण प्रकल्प पूर्ण करून घेण्यावर एकमत झाले. त्या दोन्ही प्रकल्पांची काय पूर्ण करावीत आणि त्या प्रकल्पांचे यश पाहूनच पुढील कामे करण्यात येतील, असा निर्णय घेण्यात आला. त्याचवेळी शहरातील रस्त्यांची दुरुस्तीची कामे या काळात पूर्ण करण्यात यावीत, असे ठरवण्यात आले. यावेळी शहरात अन्य चार पैकी कोणत्याही मलनिस्सारण प्रकल्पाचे कामे केली जाऊ नये, असे निर्देश देण्यात आले.तर, वन जमिनीचे प्रश्न दोन महिन्यात सोडवले जातील अशी माहिती ठेकेदार कंपनी कडून देण्यात आली.

### नगरपरिषदेचा निधी दावणीला

सरकारने या प्रकल्पाला ४७ कोटी मंजूर केले असून, नगरपरिषद या प्रकल्पावर सल्लागार कंपनीवर ५ कोटी रुपये खर्च करीत आहे. त्यामुळे नगरपरिषदेचा निधी देखील प्रकल्पाच्या निमित्ताने दावणीला बांधण्यात आला आहे. त्यामुळे आता ठेकेदार कंपनीचे यश अपयश पुढील सहा महिन्यावर अवलंबून आहे.

## प्रमोद गायकवाड यांना भिमरत्न पुरस्कार



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील चरी येथील प्रमोद गायकवाड यांना भिमरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. पुणे येथील एस.डी.ओव्हाळ ट्रस्ट व किमया आश्रम आयोजित हा सोहळा महात्मा ज्योतिबा फुले सांस्कृतिक भवन वानवडी येथे पार पडला. हा पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, सावित्रीबाई फुले यांच्या वंशज शांता नेवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरण करण्यात आला. यावेळी अभिनेत्री स्नेहल तरडे, ओव्हाळ ट्रस्ट अध्यक्ष अनिता ओव्हाळ, डॉ. मच्छिंद्र ओव्हाळ, दिशा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष सातकर, आरपीआय महिला आघाडीच्या शीला गांगुर्डे, ऋषिकेश केदारी, प्रकाश कांबळे, युवा उद्योजक योगेश भानुसे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. प्रमोद गायकवाड हे सामाजिक व राजकिय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहेत. समाजातील वेगवेगळे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी कायमच प्रयत्न केले आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत वेगवेगळ्या क्षेत्रातून त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. त्यामुळे यावर्षीच्या भिमरत्न गौरव पुरस्कारासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुकाध्यक्ष प्रमोद गायकवाड यांची निवड करण्यात आली.

## पेणमध्ये मटका जुगारावर छापा

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील आंतोरा गावात सुरू असलेल्या मटका जुगारावर पेण पोलिसांनी कारवाई करत एकाला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत दोन मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे दि.२३ मार्च रोजी सेलीब्रेशन रिसॉर्टवर कुंटणखाना प्रकरण समोर आले होते. त्यामधील आरोपी सेलिब्रेशन रिसॉर्टचे मालक गणेश गायकर यांचे ही नाव या मटका प्रकरणात पुढे आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, दि.१२ जून रोजी रात्रीच्या सुमारास अंतोरा पाटणेश्वर गावातील पुलाजवळील सर्कल परिसरात एक संशयित व्यक्ती खलील इस्माईल पठाण (५२) हा लोकांकडून पैसे घेऊन मोबाईलच्या माध्यमातून मटका जुगाराचे आकडे स्वीकारत असल्याचे आढळून आले. या प्रकरणात पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला असून, जप्त मुद्देमालामध्ये ओप्पो आणि रियलमी कंपनीचा मोबाईल तसेच भारतीय चलनातील रोख रकमेचा समावेश आहे. पोलिसांच्या तपासात जुगार व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या मोबाईल क्रमांकांमध्ये गणेश गायकर यांचा संदर्भ समोर आल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास आता अधिक खोलात जाण्याची शक्यता आहे.

पेण तालुक्यात मटका आणि अवैध जुगाराचे जाळे पुन्हा सक्रिय होत असतानाच पोलीसांनी समय सुचकता दाखवत या अवैध्य धंद्यावर कारवाई करून खाकीचा दरारा कायम असल्याचे दाखवून दिले आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस निरिक्षक संदिप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार सुशांत भाईर हे करत आहेत.

## कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**



रायगड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वेगवेगळ्या प्रश्नांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत प्रशासकीय अडचणी, तक्रारी आणि प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्म चर्चा झाली. तसेच, जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच बैठकीस कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे महासचिव सुरेश तांबे, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष राजेश सदावर्ते, रायगड जिल्हाध्यक्ष संजीव मोरे, महसूल संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल सुर्यवंशी, दिव्यांग विभागाचे सचिव शिवाजी बिवराळे, जिल्हा परिषद रायगडचे जिल्हाध्यक्ष खंडू बागुल, कोषाध्यक्ष विकास बडे, कार्याध्यक्ष सचिन ओव्हाळ, चिटणीस संतोष साळावकर,उपाध्यक्ष राजेंद्र गायकवाड यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या कामावर असलेल्या विविध पथकांना मानधन दिले नाही. जिल्हा समाजकल्या अधिकारी यांच्या लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार, अनुकंपावर नोकरी देणे या मुद्द्यांसह पदोन्नती, निलंबन, पेन्शन, कर्मचारी व त्यांच्या कुटूंबांना वैद्यकिय बील देणे, तीन वर्षे झालेल्या कर्मचाऱ्यांचे संकलन बदल करणे. खासगी व्यक्तीला कार्यालयात कामकाज करण्यास बंदी करणे. मागासवर्गीय गृह निर्माण सोसायटीस जागा मिळणे तसेच कर्मचाऱ्यांना कार्यालयीन सुविधा देणे, अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. त्याचबरोबर विविध समस्या आणि मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कर्मचाऱ्यांचे कोणतेही प्रश्न प्रलंबित राहणार नाहीत. प्रशासकीय स्तरावर सर्व प्रकरणांवर सकारात्मक आणि गतीने निर्णय घेतले जातील, असे आश्वासन दिले.






# पाऊस लांबल्याने आकाशाकडे डोळे

■ पेरणीची कामे अंतिम टप्प्यात
■ भाताची रोपे करपण्याची भीती

। माणगाव । प्रतिनिधी ।

रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर माणगाव तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी भातपिकाची पेरणी पूर्ण केली असली, तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजाची नजर आकाशाकडे खिळून राहिली आहे. जून महिन्याचा मध्य जवळ आला तरी पावसाने अपेक्षित हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गतवर्षी मे महिन्यातच दमदार पावसाची सुरुवात झाल्याने भातपिकाच्या कामांना वेग आला होता. यंदा मात्र, चित्र पूर्णपणे वेगळे आहे. पेरणीची बहुतांश कामे पूर्ण झाली असली, तरी पावसाअभावी उगवण, रोपांची वाढ आणि पुढील शेती नियोजनाबाबत शेतकरी साशंक आहेत.

माणगाव, महाड, तळा, रोहा आणि परिसरातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी भातपेरणी पूर्ण केली आहे. काही ठिकाणी पेरणीच्या अंतिम टप्प्यातील कामे सुरू आहेत. मात्र पेरणीनंतर आवश्यक असलेला सातत्यपूर्ण पाऊस न पडल्याने बीजांकुरण आणि रोपांच्या वाढीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर खर्च केला आहे. मात्र निसर्गाच्या



लहरीपणामुळे हा खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाने आणखी दिरंगाई केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माणगाव आणि तळा तालुक्यासह अनेक भागांमध्ये पावसाअभावी शेतीशी संबंधित विविध कामे अर्धवट राहिली आहेत. शेतजमिनींमध्ये आवश्यक ओलावा नसल्याने मशागत, खत व्यवस्थापन आणि अन्य कामांना अडथळे निर्माण होत आहेत. पावसावरच संपूर्ण हंगामाचे भविष्य अवलंबून असल्याने शेतकरी दिवसेंदिवस अधिक चिंतेत पडत आहेत. शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे की, सुरुवातीला पेरणीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते. मात्र, त्यानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या सर्व गणितांवर पाणी फेरले आहे. आता जोरदार आणि सातत्यपूर्ण पावसाची प्रतीक्षा सर्वांनाच लागून राहिली आहे.

### प्रशासनाकडून सतर्कतेचे आवाहन

**कृषी विभागाने शेतकऱ्यांना घाईघाईने अतिरिक्त खर्च न करण्याचा तसेच हवामान विभागाच्या अंदाजांवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला आहे. परिस्थितीनुसार योग्य नियोजन करून शेतीची कामे करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.**

### आशेचा किरण कायम

**अडचणी, संकटे आणि चिंतेचे ढग दाटले असले तरी कोकणातील शेतकरी आशावादी आहे. निसर्गावर अढळ विश्वास ठेवून बळीराजा अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. काळ्या ढगांच्या आगमनासह शिवार हिरवागार होईल, भातखाचरे डोलू लागतील आणि मेहनतीच्या घामाला यशाचे रूप मिळेल, या आशेवरच शेतकरी नव्या हंगामाची स्वप्ने पाहत आहे. पेरणी पूर्ण झाली असली, तरी खरी कसोटी आता पावसाची आहे; कारण बळीराजाच्या आशा, कष्ट आणि संपूर्ण हंगामाचे भविष्य सध्या आकाशातील ढगांवरच अवलंबून आहे.**

# सात गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

जून महिन्याची १२ तारीख उजाडली तरी देखील पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे पनवेल तालुक्यात तीव्र पाणी टंचाई जाणवू लागली आहे. प्रशासनाकडून सात गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे, मात्र हे पाणी देखील अपुरे पडत असल्याचे बोलले जात आहे.

उन्हाच्या झळा तीव्र जाणवू लागल्या आहेत. त्यातच पाण्याचे प्रक्षोभ निर्माण झाले असून नागरिकांचे पाण्याविना हाल होत आहेत.

जलजीवन मिशन योजना देखील पनवेलमध्ये सपशेल अपयशी झाल्याने पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. मोजक्याच ठिकाणच्या जलजीवन



मिशन योजना पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे आज देखील नागरिकांना पिण्याची पाण्याची वानवा आहे.

पनवेल पंचायत समिती पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीटंचाई आराखडा पाठवण्यात आला होता त्यानुसार सात गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यात माडभुवन, ताराटेप वाडी, शिवाजीनगर (कसळखंड) शिरढोणपाडा, बेलवाडी (नानोशी) कामठवाडी, गराडा यांचा समावेश आहे. या सात गाव वाड्यांमध्ये नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

यातील काही ठिकाणी दररोज टँकरने पाणीपुरवठा होतो तर काही ठिकाणी एक दिवसाआड किंवा आठवड्यातून काही दिवस पाणीपुरवठा होतो. तालुक्यातील काही सोसायटीमध्ये देखील पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. बोअरवेलला पाणी येत नसल्याने अन्य ठिकाणाहून विकतचे टँकरचे पाणी घ्यावे लागत आहे.

पनवेल तालुक्यातील लोकवस्ती झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत पाण्याचे स्रोत कमी आहेत. तालुक्यात धरण असून देखील धरणाचे पाणी आजूबाजूच्या ग्रामस्थांना प्यायला मिळत नाही. आणखी काही दिवस पाऊस आला नाही तर मात्र पनवेल तालुक्यात भीषण पाणीटंचाई जाणवणार आहे, त्याचा परिणाम सर्वत्र होणार आहे.

# कार्यकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बंडू तुरडे यांच्या निवडीने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी कार्यरत असलेल्या कर्जत तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित सहकार संस्थेचे अध्यक्ष पदाची निवडणूक झाली. माजी अध्यक्ष परशुराम घारे यांनी आपल्या राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. संस्थेच्या १३ सदस्यीय संचालक मंडळातून अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात अध्यासी अधिकारी शिवाजी घुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अध्यक्षपदासाठी बंडू तुरडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष तुरडे यांनी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याची ग्वाही दिली. पीक कर्ज, शासकीय योजना आणि सहकार क्षेत्रातील सेवा अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यां पर्यंत पोहोचविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी माजी अध्यक्ष परशुराम घारे,तसेच मधुकर घारे, शरद लाड यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महागाई विरोधी निषेध मोर्चाचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी ।

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) रायगड, नवी मुंबई तर्फे उरण चारफाटा येथे रविवारी (दि.१४) जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता महागाई विरोधी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला जनतेने मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारताचा कम्युनिस्ट पक्षातर्फे करण्यात आले आहे. फसव्या आणि सर्वसामान्य, मध्यमवर्गीय जनतेच्या जगण्यात अडथळा निर्माण करणाऱ्या सरकारला जाब विचारण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आयोजित महागाई विरोधी मोर्चात मोठया संख्येने सहभागी व्हा असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी कॉ. रामचंद्र म्हात्रे यांनी जनतेला केले आहे. या निषेध मोर्चात सी.आय.टी.यू.,अखिल भारतीय किसान सभा,अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, डी. वाय. एफ. आय या संघटना सहभागी होणार आहेत.

# मिठ्ठू आंधळे यांना राज्यस्तरीय 'लालपरी गौरव रत्न' पुरस्कार

। कर्जत । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इतिहासात प्रथमच प्रदान करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'लालपरी गौरव रत्न' पुरस्काराने कर्जत एसटी आगारातील वाहक मिठ्ठू त्रिंबक आंधळे यांना गौरविण्यात आले आहे. राज्यभरातील वाहकांमधून उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे त्यांची प्रथम क्रमांकाच्या सर्वोत्कृष्ट वाहक म्हणून निवड करण्यात आली असून, हा पुरस्कार मिळवणारे ते राज्यातील पहिले मानकरी ठरले आहेत. मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात मुंबई/कोकण प्रदेशाच्या प्रादेशिक व्यवस्थापक मा. चेतना




खिरवाडकर, विभाग नियंत्रक पळसुले, सांख्यिकी अधिकारी शिगोकार, प्रादेशिक यंत्र अभियंता लोंढे, विभाग नियंत्रक मुंबई पाटील तसेच यंत्र अभियंता भांगरे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांच्यासोबत वैशाली आंधळे, जय आंधळे उपस्थित होते.

या यशाबद्दल रायगड विभागाचे विभाग नियंत्रक डॉ. सुहास चौरे, विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पाटील, आगार प्रमुख देवानंद मोरे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे, वाहतूक निरीक्षक वसंत बागुल, विलास बागुल, संजय कोंडार, दिपक देशमुख, नागेश भरकले, हरिश्चंद्र छत्तीसकर, अनुजा सुरावकर, मेघा कालवणकर, मेधा भरकले, संगिता शिरगिरे, मोहन घोटकर, सौरव पाटील, लक्ष्मण पारदी, चंदू घुटे, यांत्रिकी विभागाचे यशवंत चव्हाण, किरडे, संभाजी दौंड यांच्यासह कर्जत आगारातील सर्व अधिकारी-कर्मचारी आणि असंख्य प्रवाशांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# छायाचित्रकारांनी शहिदांना वाहिली आदरांजली

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

लडाखसारख्या रणभूमीवर जीवाची बाजी लावून देशवासियांचे संरक्षण करणाऱ्या जवानांशी संवाद साधण्याबरोबरच तेथे शहीद झालेल्य जवानांच्या स्मृतीस अभिवादन करण्याची संधी महाराष्ट्रातील नामवंत छायाचित्रकारांना नुकतीच लाभली. तेथे बंदोबस्तासाठी असणाऱ्या जवानांच्या शौर्यगाथा ऐकून या छायाचित्रकारांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

महाराष्ट्रातूल नावाजलेले फोटाग्राफर यांची सहल नुकतीच लेह लडाख येथे वैभव जागुष्टे यांनी आयोजित केली. जगातील विविध



निसर्ग टिपणे व सुंदर छायचित्रे जगासमोर आणणे हा उद्देश या सहलीची आहे. परंतु लडाखच्या बर्फाच्छादित सियाचीनमध्ये जेव्हा हे छायाचित्रकार पोहोचले त्यावेळी तेथील हवामान आणि जवानांचे तेथील वास्तव पाहून सारेच थक्क झाले. शिवाय त्यांच्या पराक्रमांच्या गाथांनी मनही प्रसन्न झाले.

सियाचीन ग्लेशिअर ट्रेकिंग या मोहिमेची सर्वात पहिली बॅच २००७ मध्ये गेली होती. त्याचवर्षी आर्मी माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटची स्थापना जे. जे. सिंग मार्गदर्शनाखाली झाली. या ट्रेक दरम्यान लडाख, सियाचीनपर्यंतचा प्रवास डोळ्यांचे अक्षरशः पारणे फेडतो. समुद्रसपाटीपासून ३५०० मीटर उंचीवर असलेले, पृथ्वीवरील एक अवर्णनीय असा नजाराच आहे.

यावेळी वैभव जागुष्टे, संजय जागुष्टे, संजय सकपाळ, प्राची मोरे, डॉ मोरे, राजेंद्र वाघमारे, तावनीत कौर, आयेशा कौर, यांनीही शहीद जवानांना आदरांजली वाहिली.




# अस्मिता पवार यांचा अर्ज दाखल

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या पंचवार्षिक कालावधीत आठव्या महिला नगराध्यक्षांनी अखेर राजिनामा दिल्याने नवव्या नगराध्यक्ष पदासाठी अस्मिता उमेश पवार यांच्या पक्षसंघटनेने निर्धारित केलेल्या संधीसाठी अर्ज दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला. चंद्रकांत कळंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे नामनिर्देशन पत्र सादर केले. याप्रसंगी मंगेश नगरकर, राजू धुमाळ, मनोज प्रजापती, निलेश अहिरे, सुरेश पवार, सनी सुतार, सोनाली गायकवाड व अन्य माजी नगराध्यक्षा आणि पदाधिकारी उपस्थित होते.

शरद पवार पक्षातर्फे माणगाव तहसीलदारांना निवेदन | अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना

# 'शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या'

। माणगाव । प्रतिनिधी ।

राज्यातील शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही अटी शिवाय सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन माणगाव तहसीलदार कार्यालयामार्फत शासनाला देण्यात आले.

राज्यातील शेतकरी गेल्या




काही वर्षांपासून नापिकी, अवकाळी पाऊस, नैसर्गिक आपत्ती, वाढते उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळत असलेल्या अपुऱ्या दरांमुळे गंभीर आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी योजना शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी अनेक जाचक अटींमुळे त्यांच्यासाठी अडथळा ठरत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

सन २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेत केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी देण्याची अट अन्यायकारक आहे. राज्यातील सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांनी त्या योजनेचा लाभ घेतला होता. त्यामुळे या शेतकऱ्यांनाही इतरांप्रमाणे दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनी वन टाईम सेटलमेंट अंतर्गत अतिरिक्त रक्कम भरल्या नंतरच कर्ज माफीचा लाभ मिळणार असल्याची अटही शेतकरीविरोधी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या या विविध मागण्यांसाठी आमदार रोहित पवार यांनी शुक्रवार, दि. १२ जून पासून पंढरपूर येथे अन्नदात्यासाठी अन्नत्यागफआंदोलन सुरू केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे निवेदनातून स्पष्ट करण्यात आले. हे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष संताजी पवार यांच्या हस्ते निवासी नायब तहसीलदार अरविंद घेमुड यांना देण्यात आले.

यावेळी राजू रोडेकर, स्वप्निल सुतार, नारायण डवले, मनवेश महाडिक, सज्जाद डावरे, मुनीफ धनसे आदी उपस्थित होते.

## निवडक



### वाढदिवसानिमित्त देशी झाडांचे वृक्षारोपण

**कर्जत** : कर्जत बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शंभर देशी झाडे लावण्याचा निर्धार केला आणि तो प्रत्यक्षात उतरवीला. यावेळी कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्जतच्या प्रसिद्ध अशा कचेरी टेकडीवर वृक्षारोपण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला टेकडीवरच केक कापण्यात आला. त्यानंतर उपगराध्यक्ष संतोष पाटील, अशोक ओसवाल, महेंद्र चंदन, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुशांत पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, माजी नगरसेवक प्रवीण गांगल आदींच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी चिंच, वड, कडुलिंब, करंज आदी देशी झाडांचे वृक्षारोपण केले.याप्रसंगी उपस्थितांनी ॲड. कैलास मोरे यांच्या कामाच्या पद्धतीचे अनुभव सांगितले. तर काहींनी ॲड. मोरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे दिसतात. त्यामुळे त्यांनी त्यावर आधारित चित्रपटात काम केल्यास ते अभिनेते म्हणून सुद्धा ओळखले जातील. असे सूचित केले. सूत्रसंचालन सुनील गायकवाड यांनी केले. याप्रसंगी दीपक मोरे, सोमनाथ पालकर, ॲड. प्रमोद सुर्वे, विजयकुमार गोखले, भास्कर थोरवे, राकेश देशमुख, सतीश मुसळे, राजीव पवार, शिवाजी श्रीखंडे, अतुल पवार, हर्षल मोरे, भगवान घरत, विजय जगताप, धर्मेंद्र मोरे, लोकेश यादव स्वीटी बार्शी, विद्या वनगे, उषा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### आरटीओ अधिकाऱ्यास मारहाण करणाऱ्यास पोलीस कोठडी

**पनवेल** : तळोजा औद्योगिक वसाहतीत क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई केल्यानंतर आरटीओच्या अधिकाऱ्याला धमकावत मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी एका इसमाविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, मारहाण करणे, धमकी देणे यांसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. प्रादेशिक परिवहन विभागाच्या भरारी पथकाकडून तळोजा औद्योगिक वसाहतीतील मुख्य रस्त्यावर पकोटेक्स कंपनीसमोर वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत होती. या वेळी एमएच-४६-एफ-२६४१ क्रमांकाच्या वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून निर्धारित क्षमतेपेक्षा चार टन अधिक वजनाची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. तसेच वाहनाची कागदपत्रे तपासल्यानंतर मार्च २०२३ नंतर वाहन कर भरलेला नसल्याचे समोर आले. याशिवाय प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना आणि राष्ट्रीय परवाना अधिकृततेची वैधता संपल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे आरटीओच्या भरारी पथकाने ई-चलनद्वारे ५० हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क आकारून कारवाई केली. या कारवाईमुळे संतप्त झालेल्या नितीन रॉय (वय २५) याने संबंधित आरटीओ अधिकाऱ्यांशी वाद घालून त्यांना मारहाण केल्याची तक्रार नोंदविण्यात आली. तसेच अधिकाऱ्यांना जातीवाचक शिवीगाळीच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पोलिसांना रॉय याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### डॉ. महालिंग यांचे नगरपरिषदेतर्फे स्वागत

**आगरदांडा** : मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागातील आरोग्य सेवेला अधिक बळकटी देण्यासाठी नुकतेच नियुक्त झालेले प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. महालिंग शांती लिंग क्षीरसागर यांची मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी ग्रामीण रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या भेटीदरम्यान परिसरातील आरोग्य सुविधा, नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवा तसेच भविष्यात राबविण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. तद्नंतर डॉ महालिंग शांती लिंग क्षीरसागर यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विरेंद्र भगत, नगमाना खानजादे, पांडुरंग आरेकर, रुपेश रणदिवे, मनिष विरुकुड, श्रीकांत खोत उपस्थित होते.

### सेल्फी स्टॅण्ड ठरले सक्षमीकरणाचे प्रतीक




**आगरदांडा** : मुरूड तालुक्यात जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जनगणना प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी व अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख बनवण्यासाठी विविध ठिकाणी उभारण्यात आलेले सेल्फी स्टॅण्ड नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. केवळ छायाचित्र काढण्याचे साधन न राहता हे सेल्फी स्टॅण्ड आता आत्मविश्वास, सहभाग आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. आज मुरूड शेगवाडा येथील कुणाल शरद सतविडकर यांनी २०२७ जनगणना करण्यात आल्या नंतर सेल्फी स्टॅण्ड जवळ मी माझी जनगणना केली असा विजयी खुण दाखवत जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या नियोजन आणि विकासाचा पाया आहे. तरी तालुक्यातील नागरिकांना २०२७ जनगणना करुन प्रशासनाला सहकार्य करावे असे आ-वाहन कुणाल शरद सतविडकर यांनी यावेळी केले.

### कमलगौरी पाटील संस्थेतर्फे वृक्षारोपण

**पनवेल** : वरळी विधानसभा मतदारसंघाचे आ. आदित्य ठाकरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचे डिजिटल बॅनर किंवा दिखाऊ कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन शिवसैनिकांना केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत कमलगौरी पाटील शिक्षण संस्थेच्या वतीने तळोजा येथील संस्थेच्या परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. संस्थेचे चेअरमन बबन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमास बबन पाटील, रामदास पाटील, प्रदीप केणी, मिथुन मढवी प्राचार्य डॉ. राहुल डोंगरगावकर, प्राचार्य डॉ. मनोज अग्निहोत्री, प्राचार्य डॉ. अक्षय मेश्राम, प्राचार्य अर्चना हिवसे, प्राचार्य प्राची गाडे, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ जून

१) श्रीम.शुभांगी दत्तात्रेय नाईक मु.वरसोली, अलिबाग दि. १४-६-१९४३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**कु. दया काशीनाथ गडमुळे, स्मरणार्थ अलिबाग**

**भारती शैलेश गायकवाड, अलिबाग**

# ‘‘मानवतेचा एक थेंब रक्त द्या, जीव वाचवा...’’

**हेमकांत सोनार**



रक्तदान हे मानवतेचे सर्वोच्च दान मानले जाते. एका रक्तदात्याच्या रक्तदानामुळे तीन ते चार रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे स्वैच्छिक, विना मोबदला आणि नियमित रक्तदानाची चळवळ समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

रक्तदान क्षेत्रातील आधुनिक वैद्यकशास्त्राची भक्कम पायाभरणी करणारे महान शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टायनर यांनी सन १९०० मध्ये रक्तगट प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या या क्रांतिकारी संशोधनामुळे सुरक्षित रक्त संक्रमण शक्य झाले आणि वैद्यकीय क्षेत्रात नवे पर्व सुरू झाले. त्यांच्या जन्मदिनानिमित्त १४ जून हा दिवस जगभर ‘‘जागतिक रक्तदाता दिन‘‘ म्हणून साजरा केला जातो. या वर्षीचे शासनाचे घोषवाक्य आहे ...

‘‘मानवतेचा एक थेंब रक्त द्या, जीव वाचवा‘‘

अपघातग्रस्त रुग्ण, मोठ्या शस्त्रक्रिया, कर्करोगग्रस्त रुग्ण, थॅलेसेमिया व हिमोफिलिया बाधित रुग्ण, गंभीर रक्तक्षय असलेले रुग्ण तसेच प्रसूतीदरम्यान रक्तस्राव झालेल्या मातांचे जीवन अनेकदा रक्तदात्यांवर अवलंबून असते. आधुनिक वैद्यकीय उपचारांमध्ये रक्ताबरोबरच प्लाझ्मा, प्लेटलेट्स आणि इतर रक्तघटकांच्या दानाचीही मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासत आहे.

रक्तदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय कर्तव्य आणि मानवतेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे.

रक्तदानामुळे दात्याचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट नियमित आरोग्य तपासणीची संधी मिळते तसेच समाजोपयोगी कार्य केल्याचे आत्मिकसमाधानलाभते.

देशातील रक्तसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी युवक-युवतींनी नियमित रक्तदानासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. निरोगी युवक हे देशाच्या सुरक्षित रक्तपुरवठ्याचे खरे आधारस्तंभ आहेत. महिलांनीही वैद्यकीय निकष पूर्ण करून रक्तदानात सक्रिय सहभाग नोंदवावा. महिला रक्तदात्यांचा वाढता सहभाग हा समाजातील सकारात्मक परिवर्तनाचे प्रतीक आहे. डिजिटल युगात सोशल मीडिया हे रक्तदान जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरले आहे. रक्तदान शिबिरांची माहिती प्रसारित करणे, गरजू रुग्णांना तातडीची मदत मिळवून देणे, नवीन रक्तदाते नोंदविणे आणि रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर करणे यासाठी सोशल मीडियाचा सकारात्मक वापर होणे आवश्यक आहे.

रक्तदाते हे समाजाचे खरे जीवनदाते आहेत. त्यांच्या निस्वार्थ योगदानामुळे हजारो कुटुंबांना आशेचा किरण मिळतो. त्यामुळे रक्तदात्यांचा गौरव, सन्मान आणि प्रोत्साहन ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र रक्तदान हे कोणत्याही प्रकारच्या आर्थिक लाभ, भेटवस्तू किंवा प्रलोभनासाठी नसून केवळ मानवतेच्या भावनेतून केले गेले पाहिजे. स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदान हीच सुरक्षित रक्तपुरवठ्याची सर्वात विश्वासार्ह गुरुकिल्ली आहे.

**रक्तदान चळवळीची प्रमुख उद्दिष्टे:-**

स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदानाला प्रोत्साहन देणे.

सुरक्षित रक्त व रक्तघटकांची सर्वांना उपलब्धता सुनिश्चित करणे.

युवक व महिलांना नियमित रक्तदाता म्हणून प्रेरित करणे.

रक्तदानाविषयीचे गैरसमज आणि भीती दूर करणे.

दुर्मिळ रक्त गट असलेल्या रक्तदात्यांची माहिती संकलित करून त्यांचे प्रभावी नेटवर्क तयार करणे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून रक्तदात्यांचे जाळे अधिक मजबूत करणे.

रक्तपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम करणे.

समाजात मानवता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीची भावना दृढ करणे. चला, १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त नियमित रक्तदानाचा संकल्प करूया आणि मानवतेच्या या महान कार्यात सहभागी होऊन अनेकांना नवजीवन देऊया.

# बोरी, शिर्की परिसरात कुत्र्याचा नागरिकांवर हल्ला

**● १० ते १५ जणांना केले जखमी**

**● घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन**

**| खरोशी | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील कोळवे, बेणेघाट, बोरी, शिर्की, मसद तसेच शिर्की चाल परिसरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घालत अनेक नागरिकांवर हल्ला केल्याची घटना घडली आहे. या कुत्र्याने विविध ठिकाणी फिरत अंदाजे १० ते १५ जणांना चावा घेऊन जखमी केले असल्याचे दिसून आले.

कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांनी तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली असून तेथे रुग्णांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जखमींना रेबीज प्रतिबंधक लस व आवश्यक उपचार दिले जात आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना घराबाहेर पडताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



याबाबत विजय मोकल यांनी गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच तसेच पशुसंवर्धन विभागाला संपर्क साधून परिसरातील आरोग्य कर्मचारी, पोलीस पाटील व इतर संबंधित व्यक्तींनी तातडीने अलर्ट होण्याची आवश्यकता व्यक्त केली. पिसाळलेल्या कुत्र्याचा शोध घेऊन गावांमध्ये जनजागृती मोहीम राबवावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

ग्रामपंचायत, आरोग्य विभाग व पशुवैद्यकीय विभागाने संयुक्त मोहीम राबवावी. परिसरातील भटक्या कुत्र्यांचे सर्वेक्षण व लसीकरण करावे. नागरिकांनी कुत्रा चावल्यास जखम साबणाने किमान १५ मिनिटे स्वच्छ धुवून त्वरित वैद्यकीय उपचार घ्यावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

> **नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. तसेच पुढील अनर्थ टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे .**
>
> **-गजानन लेंडी गटविकास अधिकारी**

# शाळकरी मुलांची नेत्रतपासणी

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

मुलांमधील नेत्रविकारांचे वेळीच निदान करून त्यावर उपचार करताना शंकरा आय हॉस्पिटलने रेनबो स्कूल स्क्रीनिंग प्रोग्राम अंतर्गत मोठी कामगिरी बजावली आहे. जून २०२२ ते मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेद्वारे, भारतातील विविध भागांतील २.३३ लाखांपेक्षा जास्त शाळकरी मुलांची यशस्वी नेत्रतपासणी करण्यात आली.

या व्यापक उपक्रमाचा मुख्य उद्देश शाळकरी मुलांमधील दृष्टीसंबंधित समस्यांचे अगदी सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करणे, त्यांना वेळेवर योग्य उपचार मिळवून देणे हा होता. जेणेकरून भविष्यातील संभाव्य अंधत्व आणि दृष्टीदोषांमुळे शिक्षणात येणारे अडथळे रोखता येतील. या मोहिमेच्या आकडेवारीनुसार, प्रकल्प कालावधीत एकूण ५६३ शाळांमधील २ लाख ३३ हजार ३५७ मुलांची नेत्रतपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान अनेक मुलांमध्ये दृष्टीदोष आढळून आले, ज्यावर तातडीने उपाययोजना करत दृष्टीदोष निवारणासाठी गरजू मुलांना ७ हजार ८०१ चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. याशिवाय, डोळ्यांच्या गंभीर आजारांचे निदान झालेल्या ३२ मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टीदान देण्यात आले.

# एसटी आगाराविरोधात जन आक्रोश

## तहसीलदारांसमोर गलथान कारभाराचा वाचला पाढा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड तहसीलदार कार्यालयात तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य परिवहन मंडळाचे रायगड विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे यांच्या उपस्थित आज मुरूडचे जनतेचे सेवकांनी मुरूड एसटी डेपोच्या अनेक समस्या बाबत तक्रारीचा पाढा वाचला. विभागीय नियंत्रक डॉ. सुहास चौरे यांनी समस्या सोडविण्याचा केला प्रयत्न



यावेळी अ‍ॅड. रुपेश पाटील, कुणाल सतविडकर, नगराध्यक्षा-आराधना दांडेकर, नगरसेवक नितीन आंबुर्ले, मंगेश दांडेकर, मनिष माळी, अजित गुरव, श्रीकांत सुर्वे, रुपेश रणदिवे, उमेश भोईर, अरविंद गायकर, ललीत जैन, भावेश शहा, आदेश दांडेकर, स्वप्निल कवळे, जाहिद फकजी, अनंत जोशी, अजित कासार, महेश मानकर, कुणाल जैन, राहुल कासार, सचिन शहा, किरण नाईक निखिल दांडेकर, तारु जैन आदिंसह जनतेचे सेवक उपस्थित होते.

याप्रसंगी अ‍ॅड रुपेश पाटील, कुणाल सतविडकर, श्रीकांत सुर्वे, अरविंद गायकर, ललीत जैन, मनिष माळी, अजित गुरव, यांनी विभागीय नियंत्रक डॉ. सुहास चौरे यांना सांगितले की डेपो मॅनेजरांना तात्काळ कार्यमुक्त करावे, व त्या जागी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच डेपोत चांगले मेकॅनिकलची नेमणूक करावी, लांब पल्ल्याच्या गाड्या बंद कराव्यात. मुंबईला जाणाऱ्या अलिबाग व रोहा मार्ग या गाड्यांच्या संख्येत वाढ करावी, पावसाळ्याच्या आत काचा-खिडक्या फुटलेल्या त्वरित दुरुस्त कराव्यात. सीएनजी पंप व डिझेल पंप नसल्याने अलिबाग डेपोत सीएनजी भरण्यासाठी १ तास पेक्षा वेळ घेतला जातो. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुरूड एसटी डेपो चांगल्या फायद्यात असुन सुद्धा डेपोची दुरावस्था का? अजुनही प्रवाशांना चांगल्या सुविधा पासुन वंचित राहावे लागत आहे अशा विविध समस्या माडण्यात आल्या. यावर रायगड विभागीय नियंत्रक डॉ सुहास चौरे यांनी १५ जुन पर्यंत नविन आगार व्यवस्थापकांची नेमणूक करण्यात येईल.तसेच २५ जुन पर्यंत मेकॅनिकलची तरतूद करण्यात येणार आहे. डिझेल पंप व सीएनजी पंप या संदर्भात सविस्तर माहिती घेऊन दोन दिवसांत आगार व्यवस्थापक कडे कळवितो असे सांगितले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १४ ते २० जून २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग मोबा.९४०४७९१७९८**

## तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. शनी महाराज आपल्या राशिस्थानी आहे हे विसरू नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र, तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाईल. मात्र, आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. अपेक्षित गोष्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील. मनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका. **शुभ दिनांक : १५,१६.**

## अनावश्यक खर्च टाळा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र, सावधानता बाळगा. किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. काही नवीन प्रस्ताव मिळतील. **महिलांना :** मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **शुभ दिनांक : १७,१८.**

## प्रलोभनात अडकू नका

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. विशेषतः महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळेल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्या. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे य़ोग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक : १९,२०.**

## सामाजिक कामाला प्राधान्य द्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या. त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या सुरुवातीला कानावर चांगली बातमी येईल **महिलांना :** मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. **शुभदिनांक : १४,२०.**

## कामाची प्रशंसा होईल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. कलागुणांना वाव मिळेल. त्यांचा गौरव होण्याची शक्यता राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरामोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जमीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा. आपली जबाबदारी कमी करा. **महिलांना :** आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो, **शुभ दिनांक : १८,१९.**

## धार्मिक कार्यात रस घ्या

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र, सावधानता बाळगा.आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुर्ण होतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल. घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक : १४,१८.**

## दुसऱ्यांवर अवलंबून रहू नका

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. **शुभ दिनांक : १५,१७.**

## साहसी कृत्ये करण्याचे टाळा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता, मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल **महिलाना :** आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक : १६,२०.**

## व्यवहारात सावधानता बाळगा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपण दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतिल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल **महिलाना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक : १४,१६.**

## भक्तीमार्गाचा अवलंब करा

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. प्रकृतीची काळजी घ्या, आर्थिक बाजू ठीक राहील. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा ‘इगो’ दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका. सरकारी देणी त्वरित भरा. भक्तीमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. **महिलाना :** आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधी देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा ही ठरवा बाकी सर्व सोप होईल. **शुभ दिनांक : १५,१८.**

## ज्येष्ठांचा आदर राखा

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण शनी पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका. प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. **महिलांना:** सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागेपर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. **शुभ दिनांक : १६,१९.**

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**मीन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपणास मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल मात्र, कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. या सप्ताहात आपले ग्रहमान आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल, मात्र अहंकारापासून दूर राहा. अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. **महिलांना:** बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभ दिनांक : १७,२०.**

# कोलाडमध्ये गोदी नदीच्या पुलावर दुर्गंधी

## • ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष देण्याची गरज



**। धाटाव । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा हायवेवरील कोलाड येथे गोदी नदीच्या पुलावर चिकनच्या घाणीची प्रचंड दुर्गंधी येत याठिकाणी प्रवासी वर्गाला नाक मुठीत घेऊनच प्रवास करावा लागत असून प्रचंड दुर्गंधीमुळे येथील नागरिकांचा श्वास गुदमरत असल्याने अक्षरशः हैराण झाले आहेत. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पावसामुळे येथील दुर्गंधीत अधिकच भर पडणार असल्याने या गंभीर बाबीकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी नागरिकांतून होताना दिसत आहे.

आंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील गोदी नदीच्या पुलाखाली या परिसरातील चिकन व्यावसायिक चिकनची घाण नदीत टाकत आहेत. या गंभीर समस्येबाबत वारंवार तक्रार करून देखील चिकन विक्रेते कुणाला जुमानत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे या परिसरातुन प्रवासी वर्ग नाक अक्षरशः मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत. तर रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांचा श्वास कोंढत आहे. आंबेवाडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने सकाळी कचऱ्याचे संकलन करण्यासाठी घंटागाड्या सुद्धा उपलब्ध आहेत.मात्र तरीही येथील चिकन व्यावसायिक आपला कचरा हा गोदी नदीच्या पुलाजवळच टाकत असल्यामुळे येथे प्रचंड दुर्गंधी पसरत आहे.

येथील रस्त्याने शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवास करताना दिसतात अवघ्या दोन दिवसांवरती येऊन ठेपलेल्या पावसामुळे या रस्त्यावरील घाणीमुळे आजाराची भीती निर्माण झाली आहे.

परिसर स्वच्छ ठेवणे ग्रामपंचायत प्रशासनाची जबाबदारी असून याठिकाणी तशी जनजागृतीही करणे आवश्यक आहे. गोदी नदीच्या पूलानजीक उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या या कचऱ्यामुळे आंबेवाडी ग्रामपंचायतच्या कचरा व्यवस्थापन बाबतचा ढिसाळ कारभार मात्र उघड्यावर आला आहे.

या मार्गावरिल प्रचंड दुर्गंधीच्या त्रासापासून मुक्त करण्याची मागणी नागरिक करीत आहेत. मात्र, या गंभीर समस्येबाबत आंबेवाडी ग्रामपंचायत प्रशासन कोणती ठोस भूमिका घेणार? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**पनवेल :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनचे जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या मातोश्री सुमन साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम (दि.१७) जून रोजी राजीप प्राथमिक शाळा वडघर येथे आयोजित केलेले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्रशांत सोनावणे व निलेश कांबळे यांनी आयोजित केलेला आहे. दरवर्षी महेश साळुंखे हे पनवेल येथील गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी म्हणून आईच्या स्मरणार्थ मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम राजिप वडघर प्राथमिक मराठी शाळेमध्ये होणार आहे.

# कलोते महसूल कार्यालयाचे उद्घाटन



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील मौजे कलोते येथील नवीन अत्याधुनिक महसूल कार्यालयाचे लोकार्पण तहसीलदार अभय चव्हाण व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड उपस्थित होते.

मौजे विणेगाव, मौजे कलोते मोकाशी, कलोते रयती, निगडोली, नडोदे या पाच गावांचे हे कार्यालय आहे. महसूल अधिकारी माधव कावरखे यांनी हे अत्याधुनिक महसूल कार्यालय लोकसहभागातून उभारले आहे. या कार्यालयाची अंतर्गत बांधणी व अंतर्गत ठेव ही आधुनिक असून काम करण्याचे समाधान मिळणार असून येणारे शेतकरी, लाभार्थी यांनाही समाधान देणारे आहे. या कार्यालयात येणाऱ्या नागरिकाचे व सामान्य माणसाचे काम प्राधान्य क्रमाने झाले पाहिजे, या कार्यालयाच्या बाबतीत तक्रार येता कामा नये, असे प्रामाणिक काम व्हावे अशी अपेक्षा तहसीलदार अभय चव्हाण यांनी व्यक्त केली. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी ही या प्रशासकीय इमारतीचे कौतुक केले असून सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले, तर निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी हे नव्याने उभारलेल्या कार्यालयाबाबत महसूल अधिकारी माधव कावरखे यांचे विशेष कौतुक केले.लोकसहभागातून उभे राहिलेले कार्यालय हे खालापूर तालुक्यातील एक नमुना आहे. याचे अनुकरण जिल्ह्यात होणे अपेक्षित आहे. मंडळ अधिकारी माणिक सानप, ॲड.राजेंद्र मोरे, आप्पा शिंदे, अक्षय म्हामुनकर, निलेश बेलोसे,यांच्या सह लोकसहभाग मदत करणारे, स्थानिक शेतकरी, शेतकरी, ग्रामस्थ पंचक्रोशीतील लोक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



शेतीच्या खरीप हंगामातील पेरणीपूर्वी मशागतीची कामे उरकली असून शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. जून महिना मध्यावर आला असताना देखील पेरणी योग्य पाऊस पडत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या असून, पेरणीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. खरीप हंगाम हा जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. म्हणून आजही जिल्ह्यात शेतीला खूप महत्त्व दिले जात आहे. मृग नक्षत्राची पेरणी खरीपासाठी उत्तम असते. त्यामुळे चांगला पाऊस मृग नक्षत्रात होईल. या हेतूने शेतकऱ्यांनी महागडी बी बियाणे, खतांची जमवा जमव आणि शेतीची मशागत केली. मात्र पेरणी योग्य पाऊस होत नसल्यामुळे पेरणी करावी की न करावी हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

समजा कधी तरी पावसाच्या बरसणाऱ्या सरीवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी पेरणी केलीच, तर बियाणे वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. खाडी भागात धुळ वाफेवरची पेरणी शेतकऱ्यांनी करून घेतली आहे.

मात्र, बेभरोसाच्या पावसाचा असाच दडीचा गोंधळ सुरू राहिला. तर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येऊन शेतकऱ्यांना आर्थिक झळ बसेल. जून महिना निम्म्यावर आला असताना, पावसाने दडी मारल्याने ग्रामीण भागातील भूजल साठ्यांनी तळ गाठले आहेत. त्यामुळे नागरिकांसह गुरांना, झाडांना पाण्याच्या टंचाईची मोठी झळ बसत आहे. कधी एकदा पाऊस पडेल याची शेतकऱ्यांसह नागरिक दररोज चातकासारखी पावसाची वाट पाहत आहेत.

## पेट्रोल भरण्याच्या रांगेवरून हल्ला

**पनवेल:** तळोजा गावाजवळील पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी लागलेल्या रांगेत पुढे जाण्याच्या वादातून एका ४२ वर्षीय दुचाकीस्वारावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात संबंधित व्यक्ती जखमी झाली असून याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. साडेसातच्या सुमारास तळोजा उपनगरातील आसावरी सिडको गृहनिर्माण सोसायटीत राहणारा ४२ वर्षीय व्यक्ती आपल्या दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी तळोजा गावालगतच्या भारत पेट्रोलपंपावर गेला होता. त्या वेळी पेट्रोल भरण्यासाठी वाहनांची मोठी रांग लागली होती.

## शिहू ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर

**शिहू :** नागोठणे शिहू ग्रामपंचायत निवडणुकीसाठी पाच प्रभागांसाठी १३ जागेवर आरक्षण शुक्रवारी (दि.१२) जून रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत जाहीर झाले आहे. विशेष ग्रामसभेचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय शिहू येथे करण्यात आले होते. शासनाच्या नियमाप्रमाणे निवडणुकीच्या अगोदर एकूण पाच प्रभागांसाठी १३ जागांवर आरक्षण जाहीर करण्यात आले. शिहू ग्रामपंचायत निवडणूक प्रभाग रचना आरक्षण पेण तहसील कार्यालयातील अव्व्ल कारकून अनिल भगत, सहाय्यक अधिकारी दीपेश म्हात्रे यांनी ग्रामपंचायत कार्यालय शिहू येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत सोडत पद्धतीने जाहीर केले. या मध्ये प्रभाग क्र. एकसाठी अनुसूचित जमाती स्त्री सर्वसाधारण पुरुष असे दोन. प्रभाग क्र. दोनसाठी सर्वसाधारण स्त्री, सर्वसाधारण पुरुष असे दोन. प्रभाग क्र. तीनसाठी नामाप्र स्त्री, सर्वसाधारण स्त्री, सर्वसाधारण पुरुष असे तीन. प्रभाग क्र. चारसाठी अनुसूचित जमाती पुरुष, नामाप्र स्त्री, सर्वसाधारण पुरुष असे तीन. प्रभाग क्र. पाचसाठी नामाप्र पुरुष, सर्वसाधारण स्त्री दोन असे तीन आशा पद्धतीने पाच प्रभागांमध्ये १३ जागांसाठी सोडत पद्धतीने आरक्षण जाहीर करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# शहरातील खड्डे भरण्याचे कामे थांबवण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत नगरपरिषद हद्दीत पाईप लाईन टाकण्यासाठी कॉंक्रेट रस्ते खोदले गेले आहेत. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते अजूनही मजबूत आहेत. भिसेगाव गुंडगे रस्ता वगळता शहरातील अनेक रस्ते सुस्थितीत आहे. मात्र, या रस्त्यांना सध्या ग्रहण लागले आहे ते पाईप आणि जलवाहिन्याचे पाईप लाइन टाकण्यासाठी रस्ते खोदले जातात आणि नंतर पुन्हा दुरुस्ती केली जाते. परंतु ती दुरुस्ती अतिशय चुकीची असल्याचा आरोप पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी केला आहे. खोदलेल्या रस्त्यांवर खडी टाकुन सिमेंटचा कोबा करुन बुजवत आहेत. सदर नियम बाहय कामे थांबवून व्यवस्थित कॉंक्रीटचे खड्डे भरण्याची तंत्र विकसित झाले आहे. तंत्राचा वापर करून शहरातील खडे भरावेत अशी मागणी केली आहे. शहरात खड्डे भरण्याची सुरू असलेल्या कामे थांबवावी अशी मागणी पोलीस मित्र संघटनेने केली आहे.

नगरपरिषद मुख्याधिकारी आणि बांधकाम विभाग अधिकारी बघ्याची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे निकृष्ट कामावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा कामाच्या ठिकाणी बसून बेमुदत आमरण उपोषण सुरू करणार असा इशारा रमेश कदम यांनी दिला आहे.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई- निविदा सुचना**
**मलनि:स्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबंधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत निविदा रक्कम(रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| | PMC/ SEWERAGE /01/2026-27 | पनवेल महानगरपालिका मालकीच्या कामोठे, सेक्टर ३२ येथील ८५ द.ल.लि.क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रांचे नुतनीकरण करुन दोन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | रु.३९,२८,०४,१८७/- (रु.३५,१७,०३,५६०/- Biddable amount + रु.४,११,००,६२७/-(Non-Biddable amount) | १९,६४,१००/- | ३,५४०/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १५/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/मल.वि./२२२५/प्र.क्र.०२/५२१/२०२६
दिनांक- १२/०६/२०२६

सही/-
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालक १. श्री. प्रशांत वामन कवळे, २. सौ. विणा प्रशांत कवळे, रा. १३६३ दुर्वांकुर, अंकूर नर्सरी रोड, विद्यानगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेला आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग जि.रायगड | ५१/१/५१/२/५१/३/५५/२/८ | एकुण ३-८०-०० | ३८-०० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१४.०६.२०२६

**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

• दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८

• नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२

• Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रवि. दि. २८ जून सायं. ५ वा.
पीएनपी नाट्यगृह (अलिबाग)
ऑनलाईन तिकिट विक्री bookmyshow सुरु
तिकिट विक्री २५ जूनपासून नाट्यगृहावर सुरु




प्रमुख भूमिकेत- सनीभुषण मुणगेकर, श्रद्धा हांडे, चेटकीच्या भूमिकेत निलेश गोपनारायण | प्रयोग संपर्क- ९८२०८७६८८९
तिकिटांसाठी संपर्क - चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६
संपर्क - विकास पावसकर ९९२०६२९९२३, सुनील पानकर ९४२२६३०१०५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्री.दत्तात्रेय बाळकृष्ण चव्हाण रा.भादाणे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग, जि.रायगड | ४८ | ०-१७-०० पो.ख. ०-०९-०० एकूण ०-२६-०० | ४.३१ |

सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस, भाडेपट्टा, फरोक्तखत, लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १३/०६/२०२६

सही /-
**(ॲड.वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४५/७/अ | एकूण क्षेत्र ०-५३-०० हे.आर, | ०.३७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-१४/०६/२०२६

सही /-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे बोर्झे, ता.पेण, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - बोर्झे, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| नरेंद्र खंडेराव राऊत<br>विशाल नरेंद्र राऊत | १७९ | — | ०-६३.१० | ९.३९ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील नरेंद्र खंडेराव राऊत वगैरे २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १४/०६/२०२६.

**श्री. तुषार द.देवरे, अॅडव्होकेट**
पत्ता:फ्लॅट नं.ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि.रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम असुन सदर मिळकतीचे विद्यमान खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सदानंद धर्माजी म्हात्रे | ३२७ | २ | ०-२१.०० | ३.०० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सदानंद धर्माजी म्हात्रे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १४/०६/२०२६.

**श्री.तुषार द.देवरे, अॅडव्होकेट**
पत्ता:फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १२९/१० | एकूण क्षेत्र ०-६४-०० हे.आर, | ८.३१ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतेही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-१४/०६/२०२६


**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

▶**मेष** : प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. कौटुंबिक प्रश्नांबाबत दिलासा मिळेल. नव्या ओळखी कामी येतील.
▶**वृषभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. प्रापंचिक प्रश्नांचा ताण राहील. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
▶**मिथुन** : तुमच्या कला-गुणांचा विकास होईल. महत्त्वाचे निर्णय दूरदृष्टीनं घ्यावे. प्रवास शक्यतो टाळावा.
▶**कर्क** : मोठ्या खरेदीचे करार मार्गी लागतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अचानक धनलाभ संभवतो.
▶**सिंह** : दानधर्माकडे ओढा राहील. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरेल.
▶**कन्या** : व्यर्थ चिंता करू नका. प्रगतीच्या संधी चालून येतील. प्रक्रिया उद्योगात विशेष अनुकूलता राहील.
▶**तूळ** : दागिने, रोख रकमेबाबत विशेष काळजी घ्यावी. वादात मध्यस्थी नको. व्यवसायाचा व्याप वाढेल.
▶**वृश्चिक** : महत्त्वपूर्ण घटनांनी दिलासा मिळेल. अनावश्यक खरेदीवर भर राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
▶**धनु** : कामाचं योग्य नियोजन करा. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवा. स्थापत्य क्षेत्रात प्रगती करता येईल.
▶**मकर** : अनुभवाचे बोल ध्यानी घ्या. करार-मदार विचारपूर्वक करावेत. कलाकारांचा उत्साह वाढता राहील.
▶**कुंभ** : सरकारी योजनांचा लाभ घ्यावा. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
▶**मीन** : भावंडांशी मतभेद संभवतात. स्थावर प्रश्नामुळे ताण वाढेल. कुलदेवतेची उपासना करायला हवी.

ब्युटी टॉक

## तंत्र फेस मास्क वापराचं

कोरडी त्वचा असणाऱ्यांनी क्रीम किंवा शीट मास्क वापरावा. यामुळे तुमच्या त्वचेला अतिरिक्त ओलावा मिळतो. तेलकट त्वचा किंवा मुरुमांचा त्रास असेल मड किंवा क्ले मास्कची निवड करावी. यामुळे तुमचा चेहरा नितळ दिसू लागतो. क्ले मास्क अतिरिक्त तेल शोषून घेतो. पण त्याचा अतिवापर टाळावा. त्वचेवरची रोमछिद्र उघडण्यासाठी चारकोल फेसमास्क वापरता येईल. संवेदनशील त्वचा असेल तर नैसर्गिक घटकांनी बनवलेला फेस मास्क वापरा. मास्क चेहऱ्यावर फार वेळ ठेऊ नका. सुरूवातीला मास्क २० मिनिटं ठेवा. मग हळूहळू वेळ वाढवा. शीट किंवा नाईट मास्क आठवड्यातून एकदा वापरायचे असतात. हायड्रेटिंग मास्क आठवड्यातून तीन किंवा चार वेळा वापरता येतात. फेस मास्क वापरण्याआधी चेहरा क्लिंजिंग क्रीमने स्वच्छ धुवून घ्या. यामुळे चेहऱ्यावरची मृत त्वचा, धूळ निघून जाईल आणि फेस मास्क अधिक परिणामकारक ठरेल.

## १४ जून

दिनविशेष

**२०१३** : पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्री एम. वीरप्पा मोईली यांचा तेल आयात लॉबी धमक्या देत असल्याचा आरोप.
**२०१५** : ललित मोदींना व्हिसासाठी मदत केल्याच्या मुद्यावरून परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज अडचणीत.
**२०१७** : लंडनमधील २७ मजली ग्रेनफेल टॉवरला आग.
**२०१८** : पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्येचा कट तीन घरांमध्ये रचल्याची मास्टरमाईंड अमोल काळेची कबुली.

ॲप वर्ल्ड

## स्क्रीनशॉटशिवाय सेव्ह करा मेसेज

व्हॉट्स ॲपवरचं एखादं महत्त्वाचं चॅट आपल्याला सेव्ह करायचं असतं. त्यात काही अभ्यासाच्या टिप्स असू शकतात. नोट्सही पाठवलेल्या असू शकतात. यासाठी स्क्रीनशॉट घ्यावा लागतो. मात्र स्क्रीनशॉट न घेताही तुम्ही व्हॉट्स ॲपवरचा मेसेज किंवा चॅट सेव्ह करू शकता. या फीचरमुळे युजर्स प्रायव्हेट किंवा ग्रुप चॅट बुकमार्कही करू शकतात. अँड्रॉइडसह आयओएस आणि विंडोज युजर्सही या फीचरचा वापर करू शकतात.

स्क्रीनशॉटशिवाय मेसेज सेव्ह करायचा असेल तर सर्वात आधी व्हॉट्स ॲप ओपन करा. सेव्ह करायच्या चॅटवर जा. आता बुकमार्क करायचा मेसेज सिलेक्ट करा. यासाठी मेसेजवर टॅप करून काही वेळ होल्ड करा. यानंतर स्क्रीनच्या वरच्या बाजूला स्टार आयकॉन दिसेल. त्यावर टॅप करा. यानंतर तुमचा मेसेज स्टारमार्क म्हणजे बुकमार्क होऊन जाईल. यामुळे स्क्रीनशॉट घेण्याची काहीच गरज पडणार नाही. तुम्ही अगदी झटपट मेसेज सेव्ह करू शकता.

## पंचांग

**रविवार, १४ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ कृ. १४, चंद्रराशी : वृषभ,
नक्षत्र : रोहिणी, योग : धृति,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१५

## फॉरवर्ड्स

**फिर आँधियों ने सिखाया वहाँ सफ़र का हुनर...**

**जहाँ चराग़ हमें रास्ता दिखा न सकें...!**

आरोग्यमंत्र

## जपा निसर्गाचा शेजार

सतत थकवा, कंटाळा, अस्वस्थता जाणवत असेल, कृत्रिम प्रकाशात जास्त काळ घालवत असाल तर तुम्हाला नेचर डेफिसिट डिसऑर्डर आहे हे ओळखायला हवं. सध्या माणूस आणि निसर्ग यांच्यातली दरी वाढत आहे. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी काय करायला हवं?

* स्वत:ला निसर्गाशी जोडून घ्या. निसर्गसंपन्न वातावरणात चालल्यानेही बरं वाटू शकतं. ताण कमी करण्यासाठी अशा ग्रीन थेरपीची गरज असते. ग्रीन थेरपीमुळे मूड चांगला होतो आणि शरीरही ताजंतवानं होतं. * कोवळं ऊन हा 'ड' जीवनसत्त्वाचा महत्त्वाचा स्रोत मानला जातो. काही काळ सूर्यप्रकाशात राहिल्याने नैराश्य दूर होतं. रक्तातल्या ऑक्सिजनचा प्रवाह सुधारतो. त्यामुळे काही काळ सूर्यप्रकाशात घालवायला हवा. * फॉरेस्ट बाथिंगचा पर्यायही निवडता येईल. ही जपानी थेरपी आहे. याला 'शिरिन-याकू' असंही म्हटलं जातं. यात जंगलात जाऊन आंघोळ केली जाते. यामुळे ताण कमी व्हायला मदत होते. * नदीकिनारी किंवा समुद्रकिनारी जा. कोवळं ऊन घेण्यासाठी नदीकाठ किंवा समुद्र किनाऱ्यासारखी जागा नाही. * रात्रीच्या वेळी मोकळ्या आकाशाखाली वेळ घालवा. * कामाचा ताण कमी करण्यासाठी मोकळ्या वातावरणात मिटिंग घ्या. वॉकिंग मिटिंग हा एक चांगला पर्याय आहे. कॉर्पोरेट जगात हा प्रकार लोकप्रिय ठरू लागला आहे. मिटिंग निसर्गसंपन्न वातावरणात ठेवल्यामुळे कर्मचारी तणावरहित होतील.



## वेगळ्या वाटा


फॅशनविश्वात क्रिएटिव्ह प्रोफेशनल्सना बऱ्याच संधी उपलब्ध आहेत. फॅशन जगत फक्त प्रावरणांपुरतं मर्यादित नाही. इथे तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने करीअर करू शकता.

* फॅशनविश्वात पब्लिक रिलेशन्स म्हणजे जनसंपर्काला विशेष महत्त्व आहे. ब्रँड्सना माध्यमक्षेत्रात आपली उपस्थिती नोंदवावी लागते. फॅशन पीआरच्या माध्यमातून कंपनी परदेशी कंपन्या आणि इतर व्यावसायिकांच्या संपर्कात रहाते. संवादकौशल्य असेल तर तुम्ही फॅशन पीआर म्हणून काम करू शकता. **(क्रमश:)**

## आगळावेगळा पर्याय!

करिअरवाटा

वाचनाची आवड असेल तर वाचनाच्या क्षेत्रातच करीअर करणं कोणाला आवडणार नाही! कारण आवडीचं काम करताना खूप मजा येते. वाचनाची आवड असणाऱ्यांसाठी काही चांगले पर्याय आहेत. त्याविषयी... * तुम्हाला प्रकाशनाच्या क्षेत्रात पाऊल टाकता येईल. प्रकाशक या नात्याने विविध हस्तलिखितं वाचण्याची संधी मिळेल. पुस्तकात काही बदल सुचवता येतील. यानिमित्ताने नव्या तसंच जाणत्या लेखकांचे विचार जाणून घेण्याची संधी मिळेल. * तुम्ही ग्रंथपाल म्हणूनही काम करू शकता. हे काम करताना दिवसभर वाचता आलं नाही तरी विविध वाचनप्रिय लोकांशी संवाद साधता येईल. समविचारी लोकांशी संपर्क वाढवता येईल. * वाचताना आपलं विश्व समृद्ध होत जातं. वैचारिक क्षमता वाढते. नव्या कल्पना सुचतात. या कल्पना तुम्ही शब्दबद्ध करु शकता. स्वत:चं पुस्तक काढू शकता. कादंबरी लिहू शकता. * संपादनाच्या क्षेत्रातही करीअर करता येईल. इथेही तुम्ही भरपूर वाचू शकता. * वाचनाची आवड असेल तर पत्रकारितेचं क्षेत्रंही चांगलं आहे. इथे लिहिण्याचीही संधी मिळेल.



खेचाखेची

## श्रमदान

**संता** : अरे बंता, इतके दिवस कुठे गेला होतास ?

**बंता** : अरे, मी श्रमदान करायला गेलो होतो.

**संता** : श्रमदान? कुठे?

**बंता** : जेलमध्ये! अरे, मला सहा महिने सश्रम कारावास झाला होता ना!

## वेगळं काही

ब्रिटनमधले प्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर सायमन यांनी आपल्या घराच्या बागेत उंदरांसाठी घर तयार केलं. इथे राहणाऱ्या उंदरांना ते फळं आणि इतर खाद्यपदार्थ देतात. एके दिवशी बागेत काम करत असताना डेल यांना उंदीर दिसला. तेवढ्यात एक मांजर आलं. हे मांजर उंदराकडे बघत होतं. मांजर उंदराची शिकार करणार असल्याचं बघून त्यांनी घरातून एक बॉक्स आणला आणि उंदरासाठी घर तयार केलं. डेल यांनी उंदराचं नाव जॉर्ज ठेवलं. हा जॉर्ज या घरात रहायला आला. त्यानंतर इतर काही उंदीर राहायला आले. त्यांचं कुटुंब वाढत गेलं. मग डेल यांनी अजून खोल्या तयार केल्या. या खोल्या आतून एकमेकांशी जोडलेल्या आहेत.

## चमचमीत आलू टिक्की

रुचिरा

चहासोबत काहीतरी चटपटीत खावं असं वाटत असतं. चला तर मग, आलू-दाल टिक्की ट्राय करून बघू या.

**साहित्य:** अर्धी वाटी हरभरा डाळ, दोन वाट्या उकडून मॅश केलेले बटाटे, चार ब्रेड स्लाईस, दोन टेबलस्पून लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन किंवा तीन हिरव्या मिरच्या (बारीक चिरुन), एक टीस्पून तिखट, एक टीस्पून गरम मसाला, जिरे पावडर, एक टीस्पून धने पावडर, तळण्यासाठी तेल, चवीला मीठ इत्यादी.



**कृती:** सर्वप्रथम डाळ दोन ते तीन तास भिजत ठेवावी. त्यानंतर शिजवून घ्यावी आणि पाणी काढून बाजूला ठेवावी. नंतर मॅश केलेला बटाटा, डाळ, बारीकचुरलेला ब्रेड, कोथिंबीर, लिंबाचा रस, मिरच्या ही सामग्री एकत्र करावी. या मिश्रणात तिखट, गरम मसाला, धने-जिरे पावडर, मोहन मिसळून घ्यावं. हलक्या हाताने मळावं. टिक्की थापून घ्यावी. आता तव्यावर थोडं तेल घालून त्यावर टिक्की ठेवावी आणि सोनेरी रंगावर फ्राय करून घ्यावी. आवडत्या चटणीसोबत गरमा गरम खायला घ्यावी.

## सुडोकू ११६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | ४ | १ | ७ | | | |
| २ | | | ८ | | | | ४ | |
| ६ | | | ५ | | | ८ | | ७ |
| १ | | ९ | | | | | | |
| | ३ | | | ७ | | | १ | |
| | | | | | | २ | | ३ |
| ४ | | ३ | | | ९ | | | ६ |
| | २ | | | | ५ | | | ४ |
| | | | १ | ४ | ३ | ९ | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ४ | ८ | २ | ५ | ३ | ७ | ९ |
| ५ | ७ | ९ | ४ | ६ | ३ | ८ | २ | १ |
| २ | ३ | ८ | ९ | १ | ७ | ६ | ५ | ४ |
| ९ | ४ | ६ | ३ | ७ | २ | १ | ८ | ५ |
| ८ | ५ | १ | ६ | ९ | ४ | २ | ३ | ७ |
| ३ | २ | ७ | १ | ५ | ८ | ४ | ९ | ६ |
| ४ | ८ | ५ | ७ | ३ | १ | ९ | ६ | २ |
| १ | ९ | २ | ५ | ८ | ६ | ७ | ४ | ३ |
| ७ | ६ | ३ | २ | ४ | ९ | ५ | १ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ११६

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | | ६ | ■ | ७ | ■ | ८ | | ९ | |
| १० | | ■ | ११ | | १२ | | ■ | १३ | १४ | | १५ | | ■ | | ■ |
| १६ | | १७ | | ■ | | ■ | १८ | | | ■ | | ■ | १९ | | २० |
| | ■ | | ■ | २१ | | | | | ■ | २२ | | २३ | | ■ | |
| २४ | २५ | | २६ | | | ■ | | ■ | २७ | | ■ | | ■ | २८ | |
| २९ | | ■ | ३० | | ■ | ३१ | | ३२ | | ■ | ३३ | | ३४ | | |
| ■ | ३५ | ३६ | | ■ | ३७ | | ■ | ३८ | | ■ | | ■ | ३९ | | ■ |
| ४० | | | ■ | ४१ | | | ४२ | ■ | ४३ | ४४ | | ४५ | | ■ | ४६ |
| ■ | ४७ | | ४८ | | ■ | ■ | | ■ | ४९ | | ■ | | ■ | ५० | |
| ५१ | ■ | ५२ | | ■ | ५३ | | ■ | ५४ | | ■ | ५५ | | ५६ | | |
| ५७ | ५८ | ■ | ५९ | | | ■ | ६० | | ■ | ६१ | | ■ | ६२ | | |
| ६३ | | ६४ | | ■ | ६५ | ६६ | | ■ | ६७ | ■ | ६८ | | ■ | ■ | |
| ■ | ६९ | | ■ | ७० | | | ■ | ७१ | | | | ■ | ■ | ७२ | |
| ७३ | ■ | ७४ | | | ■ | ७५ | | | | ■ | ■ | ७६ | | | ■ |
| ७७ | | | ■ | ७८ | | | ■ | ७९ | | ८० | ■ | | ■ | ८१ | ८२ |
| | ■ | ८३ | | | ■ | ८४ | | | ■ | ८५ | | | ■ | ८६ | |

**आडवे शब्द :-**
१) पोलिस
५) शपथ (हिं.)
८) वर्षानुवर्षे
१०) सोन्या-चांदीचा धागा
११) त्वरित
१३) परिस्थिती
१६) राजाचा राज्य करण्याचा कालावधी
१८) चिलट
१९) पोरका
२१) समुद्र
२२) सुटकेचा रस्ता
२४) जन्ममृत्यू
२७) हिंदीत पत्र
२८) कावळा
२९) धुळीचा कण
३०) सत्ता
३१) त्रास देणारा आवाजांचा गोंधळ
३३) दु:खित होणे
३५) दुलई
३७) विहीर
३८) काकवीपेक्षा दाट उसाचा रांधा(मळी
३९) कबूल,खूष, मान्य
४०) दुसऱ्यांदा,दोनदा
४१) कवाड
४३) मरेपर्यंत
४७) वंशावळ
४९) लोणच्यातील द्रवमसाला
५०) चिंच कुसकरलेले पाणी
५२) सुट्टी
५३) ममता,प्रेम,धन
५४) मज्जाव,बंदी
५५) नाहक,उगाच
५७) फोडामधील द्रवांश
५९) संगीतातील एक राग
६०) विशेष
६१) आजोबा
६२) सैन्याचा तळ,होडी,नाव
६३) मोठा राजा,सम्राट
६५) हिंमत,धैर्य
६८) सूर्य उगविण्याची दिशा
६९) गवंडी
७०) चिंतन
७१) नौदल
७२) मारल्याची खूण
७४) आर्थिक,मानसिक ताकद
७५) भांडण
७६) पवित्र
७७) कुराणातील वचने
७८) दर्शव
७९) काळी मिरी
८१) पाण्याचे हवेत झालेले रुपांतर
८३) दात
८४) मोठी टोपली
८५) भडीमार,मारा
८६) उथळ वाटी

**उभे शब्द:-**
१) दृष्टीभेट
२) नड,आवश्यकता
३) बदल
४) बारीक केस
५) हात
६) महोदय
७) निवासस्थान
८) टरफल
९) तपस्या
१२) अंग मोडून येणे
१४) दैव,नशीब (इं.)
१५) बडबड्या
१७) वस्त्र,कापड
१८) अतिशय मुलायम कापड प्रकार
१९) शर्त
२०) आदळणे,येऊन पोहोचणे
२१) एक सुगंधी वनस्पती
२२) प्रतिष्ठा,अब्रू
२३) सापाचे घर
२५) टेहळणी करणारा
२६) साय
२७) गुप्त चर्चेची जागा
२८) चिंता
३१) कट्टर
३२) मडके
३३) भांडण
३४) लग्नानंतरची मिरवणूक
३६) अटीतील दोन शब्द
३७) अजगर
४१) एक श्वासरोग
४२) अतिशय
४४) शंकर,प्रत्येक
४५) वेदना
४६) देवाण घेवाण, व्यवहार,जाणे येणे
४८) अवैध,अयोग्य (हिं.)
५०) शुष्क,चाबूक
५१) लेखणी
५३) सन्मानाची अल्प रक्कम
५४) चामखीळ
५५) प्रसिद्ध गोलघुमट असलेले शहर
५६) स्त्रियांचे एक कर्णभूषण,तुकडा
५८) आश्रय,थारा
६०) पूर्ण जळणे
६४) युवराज
६६) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
६७) नवा जोम, चपलता, चलाखी
७०) मत देण्याची क्रिया
७१) येणे
७२) अरण्यवास
७३) चाकरी
७६) पदर
८०) रुची,स्वाद
८२) चीर,भेग.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | दे | श | ■ | मा | ■ | ह | ल | क | ट | ■ | रा | म | प | हा | रा |
| ग्रा | ■ | ह | का | ल | प | ट्टी | ■ | ळ | ■ | म | स्त | ■ | न | ■ | म |
| म | ग | र | ■ | कं | प | ■ | व | सा | ह | त | ■ | सा | व | का | र |
| ■ | रु | ■ | आ | स | न | मां | डी | ■ | ज | ल | द | ग | ती | ■ | स |
| क | ड | क | ड | ■ | स | ■ | ल | ह | र | ब | ह | र | ■ | स्व | ■ |
| ■ | पा | र | ■ | स | ■ | आ | था | र | ■ | ■ | न | त | म | स्त | क |
| कौ | र | व | पां | ड | व | ■ | री | ■ | म | का | ■ | ट | न | ■ | पा |
| स्तु | ■ | त | ■ | क | जा | ग | ■ | ज | ला | श | य | ■ | क | म | ळ |
| भ | ला | ■ | व | ■ | बा | र | दा | न | ■ | ■ | दा | न | व | ■ | ■ |
| ■ | ज | ग | ■ | बा | की | ■ | दा | न | वी | र | ■ | ख | डा | वा | ■ |
| गे | ला | बा | जा | र | ■ | चा | ■ | म | ज | ■ | न | भ | ■ | न | वा |
| ■ | व | ळ | ■ | व | र | चे | व | र | ■ | पा | ■ | र | स | वा | न |
| का | णा | ■ | धं | ■ | वा | ■ | स | ण | स | णी | त | ■ | ह | ■ | र |
| वे | ■ | आ | दा | न | ■ | ध | न | ■ | व | ■ | नु | क | सा | न | ■ |
| बा | जा | र | ■ | ■ | सा | ■ | वा | ज | त | गा | ज | त | ■ | ख | वा |
| ज | ■ | सा | ह | स | ■ | अं | त | र | ■ | य | ■ | रा | जा | रा | णी |

# शेतकरी, 'भू'संपादन आणि विरोधी पक्षांची ऐतिहासिक जबाबदारी

राजेंद्र झेमसे

महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेमुळे आज राज्यातील हजारो शेतकरी अस्वस्थ आहेत. हा प्रश्न केवळ जमिनीचा, मोबदल्याचा किंवा एखाद्या विशिष्ट प्रकल्पाचा राहिलेला नाही तर तो लोकशाही, मालमत्ता हक्क, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण समाजाच्या भवितव्याशी जोडला गेलेला आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांचे काम धोरणे ठरवणे असते, परंतु त्या धोरणांचा परिणाम जनतेवर काय होणार आहे याचा हिशेब विचारणे, जनतेच्या भावना शासनापर्यंत पोहोचवणे आणि चुकीच्या निर्णयांना विरोध करणे ही विरोधी पक्षांची घटनात्मक जबाबदारी असते. आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेतकरी ग्रामसभांमधून ठराव करत आहेत, प्रकप्लांच्या विरोधात हरकती दाखल करत आहेत, मोर्चे काढत आहेत, आंदोलने करत आहेत, निवेदने देत आहेत, परंतु जर हा आवाज विधानभवना पर्यंत पोहोचत नसेल तर लोकशाहीतील एक महत्त्वाचा विरोधी पक्ष नावाचा दुवा कमकुवत झाल्याचे मानावे लागेल. विरोधी पक्ष केवळ निवडणुका लढवून जनमत आजमावण्यासाठी नसतात ते जनतेच्या वेदनांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी असतात. विशेषतः जेव्हा हजारो शेतकरी आपल्या जमिनींबाबत भीती, असुरक्षितता आणि संभ्रम व्यक्त करत असतात, तेव्हा विरोधी पक्षांनी या प्रश्नाची सुमोटो दखल घेणे अपेक्षित असते. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेक वेळा विरोधी पक्षांनी जनतेचे प्रश्न रस्त्यावरून उचलून सभागृहात नेले आणि सरकारला निर्णय बदलण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे आजही शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न हा केवळ काही गावांचा किंवा काही जिल्ह्यांचा प्रश्न नसून राज्यव्यापी प्रश्न म्हणून मांडला गेला पाहिजे. कारण जमीन गेल्यानंतर केवळ मालकी बदलत नाही, तर अनेक पिढ्यांचा आर्थिक आधार, सामाजिक ओळख आणि भविष्याची सुरक्षितता धोक्यात येते. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय प्रक्रिया म्हणून न पाहता, लोकशाहीतील जनमताचा विषय म्हणून पाहिले गेले पाहिजे.

भूसंपादनाबाबत सर्वात मोठा प्रश्न म्हणजे विकासाची व्याख्या नेमकी कोण ठरवणार हा आहे. विकास म्हणजे रस्ते, बंदरे, औद्योगिक वसाहती, विमानतळ किंवा नवनगर एवढाच मर्यादित नसतो. विकास म्हणजे त्या भागा-तील लोकांचे जीवनमान उंचावणे, त्यांना सुरक्षित भविष्य देणे आणि त्यांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे देखील असते. परंतु अनेकदा असे दिसून येते की विकासाच्या नावाखाली सुपीक जमिनींचे रूपांतर



काँक्रीटच्या जंगलात करण्याचा प्रयत्न होतो, तर त्या बदल्यात शेतकऱ्यांना नेमके काय मिळणार याचे स्पष्ट उत्तर मिळत नाही. मोबदला हा जमीन गमावण्याची भरपाई असू शकतो, पण तो जमिनीचा पर्याय असू शकत नाही. कारण जमीन ही फक्त मालमत्ता नसते' ती उत्पन्नाचे साधन, सामाजिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक ओळख आणि पुढील पिढ्यांची सुरक्षा असते. आज अनेक प्रकल्पांमध्ये प्रभावित शेतकरी विचारत आहेत की, आम्हाला आमची जमीन का द्यावी लागते? पर्यायी मार्गांचा विचार का होत नाही? आधीच संपादित झालेल्या हजारो एकर जमिनींचे काय झाले? पूर्वी दिलेली आश्वासने कितपत पूर्ण झाली? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय नवीन भूसंपादनाच्या प्रक्रियांवर विश्वास निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे विरोधी पक्षांनी केवळ मोबदल्याचा मुद्दा न मांडता, विकासाच्या संपूर्ण मॉडेलवर चर्चा घडवून आणली पाहिजे. राज्यातील प्रत्येक मोठ्या प्रकल्पासाठी स्वतंत्र सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय मूल्यमापन अहवाल सभागृहात सादर करण्याची मागणी केली पाहिजे. जनतेच्या संमती शिवाय आणि पूर्ण माहिती शिवाय विकासाच्या नावा खाली घेतले जाणारे निर्णय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरतात, हे स्पष्टपणे मांडले गेले पाहिजे.

आज महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांच्या मनात एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे पूर्वी ज्यांच्या जमिनी संपादित झाल्या, त्यांचे खरोखर भले झाले आहे का? हा प्रश्न विचारल्याशिवाय आणि या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय नवीन भूसंपादनाचा विचार होता कामा नये. राज्यात विविध औद्योगिक, पायाभूत आणि विशेष प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी घेतल्या गेल्या. त्या प्रकल्पांमुळे किती रोजगार निर्माण झाले, किती कुटुंबांचे पुनर्वसन यशस्वी झाले, किती जमीन प्रत्यक्ष वापरली गेली आणि किती जमीन वर्षानुवर्षे पडून राहिली याचा अधिकृत श्वेतपत्रिका स्वरूपात हिशेब जनतेसमोर ठेवला गेला पाहिजे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी जमीन गमावली, परंतु अपेक्षित रोजगार, विकास किंवा पुनर्वसन मिळाले नाही अशी भावना आजही शेतकऱ्यांमध्ये दिसून येते. त्यामुळे नवीन प्रकल्प जाहीर करण्यापूर्वी जुन्या प्रकल्पांचे सामाजिक लेखा-परीक्षण करणे ही काळाची गरज आहे. विरोधी आणि विविध पक्ष संघटनांनी हा मुद्दा जोरदारपणे उचलून धरला पाहिजे. सरकारला विचारले पाहिजे की, पूर्वी संपादित केलेल्या जमिनींचा वापर कितपत झाला? जमीन संपादन होऊन १५ वर्षीपेक्षा अधिक काळ उलटून गेल्यानंतरही प्रकल्प उभे राहिले नाहीत त्या जमिनी शेतकऱ्यांना कधी परत करणार? खाजगी वाटाघाटीने, शेतकऱ्यांची फसवणूक करून संपादन केलेल्या मात्र शासनानेच प्रकल्प रद्द ठरवल्यानंतरही जमिनी भांडवलदारांच्या नावे झाल्या आहेत त्या जमिनी शेतकऱ्यांना पुर्ववत कशा परत करणार? पडून असलेल्या जमिनींचे काय होणार? ज्या शेतकऱ्यांनी त्याग केला त्यांचे जीवनमान कितपत सुधारले? कारण विकासाचा खरा अर्थ कागदा वरील गुंतवणूक नसून प्रत्यक्ष नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल हा असतो. जोपर्यंत जुन्या भूसंपादनाचा प्रामाणिक हिशेब दिला जात नाही, तो पर्यंत नवीन भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होणार नाहीत. म्हणूनच ''आधी हिशेब, मग नवीन संपादन'' ही मागणी केवळ भावनिक नाही तर लोकशाहीच्या दृष्टीने पूर्णपणे न्याय्य आणि रास्त आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे आणि विधानपरिषदेचे प्रत्येक अधिवेशन हे केवळ कायदे मंजूर करण्यासाठी किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यासाठी नसते, तर ते राज्यातील जनतेच्या वेदना, प्रश्न आणि संघर्ष शासनासमोर मांडण्याचे सर्वोच्च घटनात्मक व्यासपीठ असते. आज महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये विविध प्रकल्पांच्या नावा खाली सुपीक शेतजमिनींच्या भूसंपादनाच्या प्रक्रिया सुरू आहेत. काही ठिकाणी महामार्ग, काही ठिकाणी औद्योगिक वसाहती, काही ठिकाणी बंदरे, विमानतळ, कॉरिडॉर, ऊर्जा प्रकल्प किंवा नवनगरांच्या नावाखाली हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी लक्ष्य केल्या जात आहेत. या प्रक्रियांना स्थानिक स्तरावर तीव्र विरोध होत असताना त्या संघर्षाचा आवाज विधानभवनात पोहोचविणे ही येणाऱ्या पावसाळी अधिवेशनाची सर्वात मोठी ऐतिहासिक जबाबदारी ठरते. विशेषतः प्रस्तावित नवनगर प्रकल्पामुळे बाधित होत असलेल्या १२४ गावांमधील शेतकऱ्यांची भूमिका स्पष्ट आहे की, त्यांना जमीन गमावून विकास नको आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय किंवा आर्थिक विषय म्हणून नव्हे, तर सामाजिक न्याय, लोकशाही आणि घटनात्मक अधिकारांच्या दृष्टिकोनातून पाहिले जाणे आवश्यक आहे. अधिवेशनात या प्रकल्पांचे, मास्टर प्लॅन, आर्थिक व्यवहार्यता, पर्यावरणीय परिणाम, सामाजिक परिणाम, पुनर्वसनाची वास्तविकता आणि पूर्वीच्या प्रकल्पांचे परिणाम यांवर सखोल चर्चा होणे गरजेचे आहे. ज्या शासनाने पूर्वी, औद्योगिक क्षेत्रे किंवा इतर प्रकल्पांसाठी जमीन घेतली, त्या जमिनींचा आज नेमका काय वापर झाला, किती लोकांचे पुनर्वसन झाले आणि किती लोक उद्ध्वस्त झाले याचा हिशेब जनतेसमोर मांडण्याची मागणी विरोधी पक्षांनी करणे आवश्यक आहे. जर अधिवेशनात हा प्रश्न केवळ काही मिनिटांच्या चर्चेपुरता मर्यादित राहिला, तर तो शेतकऱ्यांच्या अपेक्षांचा विश्वासघात ठरेल. कारण हजारो कुटुंबांच्या भविष्याचा प्रश्न आज या अधिवेशनाशी जोडला गेला आहे. म्हणूनच हे अधिवेशन महाराष्ट्राच्या शेतकरी इतिहासातील एक निर्णायक वळण ठरू शकते.

लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्ष हे केवळ सत्तेचे टीकाकार नसतात, तर ते जनतेचे घटनात्मक रक्षक असतात. सरकार चुकीचा निर्णय घेत असेल, जनतेच्या भावना दुर्लक्षित करत असेल किंवा मोठ्या आर्थिक शक्तींच्या दबावाखाली धोरणे राबवत असेल, तर त्या विरोधात ठामपणे उभे राहण्याची जबाबदारी विरोधी पक्षांची असते. महाराष्ट्रात आज विविध प्रकल्पांमुळे शेतकरी अस्वस्थ आहेत. अनेक गावांमध्ये ग्रामसभा विरोधात ठराव करत आहेत, आंदोलने होत आहेत, निवेदने दिली जात आहेत आणि हजारो हरकती दाखल होत आहेत. अशा वेळी विरोधी पक्षांनी केवळ प्रसिद्धी पत्रके काढून किंवा सोशल मीडियावर प्रतिक्रिया देऊन आपली जबाबदारी संपली असे समजू नये. त्यांनी विधानसभेत आणि विधानपरिषदेत या प्रश्नांवर सातत्याने चर्चा घडवून आणली पाहिजे, संबंधित मंत्र्यांना जाब विचारला पाहिजे, समित्या नेमण्याची मागणी केली पाहिजे आणि आवश्यक असल्यास सभागृहाचे कामकाज रोखून धरूनही शेतकऱ्यांची बाजू मांडली पाहिजे. कारण इतिहासात अनेक वेळा असे घडले आहे की, जनआंदोलनांचा आवाज विरोधी पक्षांनी उचलून धरल्यामुळे शासनाला निर्णय बदलावे लागले आहेत. जर आज विरोधी पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गप्प बसले, तर जनतेमध्ये असा संदेश जाईल की सत्ताधारी आणि विरोधक या दोघांमध्येही या विषयावर फारसा फरक राहिलेला नाही, दोघेही एकाच माळेचे मणी आहेत. त्यामुळे ही केवळ शेतकऱ्यांची नव्हे, तर विरोधी पक्षांच्या विश्वासार्हतेची देखील कसोटी आहे. पुढील निवडणुकांमध्ये जनता केवळ आश्वासने लक्षात ठेवत नाही, तर संकटकाळात कोण त्यांच्या पाठीशी उभा राहिला हे देखील लक्षात ठेवते. म्हणूनच विरोधी पक्षांनी या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे आणि शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी रस्त्यावर तसेच सभागृहात प्रभावी लढा उभारला पाहिजे.

शेतकरी जमीन का देऊ इच्छित नाही, हा प्रश्न अनेकदा वरवरच्या पातळीवर विचारला जातो परंतु, त्यामागील वास्तव अत्यंत खोल आणि व्यापक आहे. जमीन ही शेतकऱ्यासाठी केवळ मालमत्ता नसते, ती त्याच्या कुटुंबाची सुरक्षितता, उपजीविका, सामाजिक ओळख, त्याचे जिवन धारणेचे साधन आणि पुढील पिढ्यांचे भविष्य असते. एकदा जमीन गेली की मोबदल्याच्या स्वरूपात मिळालेली रक्कम काही वर्षांत संपुष्टात येऊ शकते, पण जमीन पुन्हा निर्माण करता येत नाही. आर्थिकदृष्ट्या पाहिले तर जमिनीचे मूल्य सतत वाढत असते, तर मोबदला एकदाच मिळतो. सामाजिकदृष्ट्या पाहिले तर जमीन गमावल्यानंतर अनेक कुटुंबे विस्थापित होतात, पारंपरिक व्यवसाय नष्ट होतात आणि ग्रामीण समाजरचना ढासळते. राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर सुपीक शेतीजमिनींचे मोठ्या प्रमाणावर होणारे रूपांतर हे अन्नसुरक्षेसाठी दीर्घकालीन धोका निर्माण करू शकते. देशाची लोकसंख्या वाढत असताना शेतीयोग्य क्षेत्र कमी होत जाणे ही चिंतेची बाब आहे. या शिवाय अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचा अनुभव असा आहे की, पूर्वी विकासाच्या नावाखाली घेतलेल्या जमिनींचा अपेक्षित वापर झाला नाही किंवा त्या नंतर व्यावसायिक कारणांसाठी वापरल्या गेल्या. त्यामुळे नव्या प्रकल्पांविषयी अविश्वास निर्माण होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच जमीन न देण्याची भूमिका ही केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून ती सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि राष्ट्रीय हिताच्या अनेक प्रश्नांशी जोडलेली आहे. शेतकरी विकासाचा विरोधक नाही, परंतु विकासाच्या नावाखाली त्याचे अस्तित्वच संपुष्टात येणार असेल, तर त्या विकासाच्या मॉडेलवर प्रश्न विचारणे हा त्याचा लोकशाही अधिकार आहे. त्यामुळे शासनाने केवळ भूसंपादनाच्या प्रक्रियेकडे न पाहता, शेतकऱ्यांच्या या व्यापक चिंतांचा गांभीर्याने विचार करूनच पुढील निर्णय घ्यावेत, हीच आजच्या काळाची गरज आहे. **

# देवभूमी हिमाचल



सफर

वर्षा कुवळेकर

८७६६५६९१३६

सुमारे २४/२५ वर्षांपूर्वी हरिद्वार, अमृतसर, वाघा बॉर्डर, नैनिताल, मसुरी, धरमशाला आणि डलहौसी अशी खूप मोठी टूर माझ्या लेकाला घेऊन नातेवाईकांसोबत केली होती. त्यावेळी धरमशालेत हॉटेलच्या खोलीतून पुसट दिसणारी हिमालयाची शिखरे माझी हुरहूर वाढवून गेली.

त्यानंतर झालेल्या अत्यंत अपुऱ्या डलहौसीच्या भेटीने या हुरहुरीत प्रचंड वाढ झाली. मनसोक्त आनंद लाभलाच नाही. समाधान तर मुळीच झाले नाही. त्यामुळे गेली काही वर्ष माझ्याबरोबर याच पहाडी भागांमध्ये फिरायला येण्यास कोणी तयार होईल का या शोधात मी होते. एक आंतरिक ओढ लागली होती की होम स्टे घेऊन एकाच जागी जाऊन रहावे. कोणताही प्रदेश पहायचे तर अशाच प्रकारे.... हा माझा फंडा असतोच. करायची हिंमत होत नव्हती. वाढलेले वय, दुखणारे पाय हे मनाच्या उधाणाला लगाम घालत होते. मैत्रिणी पण का कोणास ठाऊक अजिबात कान हलवत नव्हत्या. त्यामुळे गुपचुप बसले होते. प्रत्येक वाढदिवस हे स्वप्न दूर दूर नेत होता.

यावर्षी मात्र परमेश्वराला माझी दया आली. अगदी एकाजागी राहणे नाही पण नऊ दिवस हिमाचल मध्ये आपण जाऊया का ही विचारणा एका सखीने, सुलभाने केली.

''महाड निवासी सौरभ शेठ त्यांच्या या संस्थेद्वारा यंदा ''ऑफबीट हिमाचल'' टूर नेणार आहेत. आपण जाऊया का?'' सुलभाचा प्रस्ताव ऐकताच मी आनंदाने होकार दिला.

सौरभ शेठ हा एक मनस्वी मुलगा आहे. भारत वेगवेगळ्या कोनातून पाहण्याचा या मुलाला ध्यासच आहे जणू. चारचौघे जातात तशी मळलेली वाट न चोखाळता काही निराळे शोधण्याची याला आवड आहे. एका गुजराथी कुटुंबात जन्मलेला हा मुलगा वडिलांच्या व्यवसायात अलगद पडू शकला असता. पण जगावेगळ्या गोष्टींची आवड हा याचा स्थायीभाव आहे. उत्तरेपासून दक्षिण आणि पूर्वेपासून पश्चिम भारत तो भ्रमंती करतो. निराळ्याच सुंदर जागा शोधतो, बाकी सर्व व्यवस्थांचा अभ्यास करतो आणि मग आपल्याला सापडलेले हे वेगळे सौंदर्य दुसऱ्यांना दाखवावे या निर्मळ हेतूने तो छोट्या छोट्या ग्रुप्सना घेऊन जातो. प्रत्येक ट्रीपमध्ये पुन्हा नाविन्य शोधत राहतो. ट्रिप नसतील तेव्हा हा त्याचा शिल्पकलेचा छंद जोपासत राहतो.

तर यावेळी शिमला, कुलू, मनाली, नैनिताल, दार्जिलिंग वगैरे नेहमीची टुरिस्ट शहरे सोडून तिर्थन आणि किन्नोर व्हॅली हे नवे डेस्टिनेशन त्याने ठरवले. ''कधीही न ऐकलेली गावे, मंदिरे, छोटे छोटे ट्रेक, बाजूने नदीचा खळाळता प्रवाह, सुंदर निसर्ग, गप्पागोष्टी, गाणी आणि पुस्तके'' या शब्दात त्याने भावी ट्रिपचे वर्णन केले होते. केवळ हे वाचूनच जरी माझे पाय अतिशय जोरात नन्नाचा पाढा म्हणत होते तरीही मी तिकडे संपूर्ण कानाडोळा केला आणि जाण्यास उत्सुक झाले.

मी आणि सुलभा व्यतिरिक्त अलिबाग मधील अजून तिघी आणि पुण्यातील पाच मंडळी अशी फक्त दहाच जणांची ही टूर असणार होती. अलिबागच्या आम्ही एकमेकींना उत्तम ओळखणाऱ्या होतो. पुणेरी मंडळी कशी असणार याचे कुतूहल मनात होतेच.

आम्ही अलिबागकरणींनी थोडा वाढीव बेत असा केला की चंदिगढ पासून खरा प्रवास सुरू होणार होता. तर आपण ट्रेनने न जाता विमानाने तिथवर जाऊ आणि शेवटी एक दिवस जास्ती चंदिगढला राहून ते शहर पाहू. सौरभने ते मान्य तर केलेच पण आमच्या साठी चंदिगढ मध्ये हॉटेल आणि इनोव्हा गाडीची व्यवस्था करून दिली.

१८ मे ला पहाटेचे साडेपाच वाजताचे मुंबई एअरपोर्टवरून विमान पकडण्यासाठी १७ तारखेला रात्री १२ वाजता अलिबागहून प्रस्थान ठेवले. १८ तारखेला पुणेकरांबरोबर सौरभला दुपारी लंचच्या वेळेस प्रथमच भेटलो. आम्ही विमान-तळावर उतरल्याबरोबर इथून पुढे आमच्याबरोबर असणारी टेम्पो ट्रॅव्हलर स्वागतास सज्ज होती. पुणेकरांच्या गाडीने जरा त्रास दिला आणि तब्बल ३ तासांच्या विलंबाने ती मंडळी स्टेशनवर उतरली. आम्ही चंदिगढच्या उन्हात कावलेल्या...

अशावेळी हसतमुख प्रविणा आणि अलका खिडकीसमोर आल्या आणि ''कशा आहात तुम्ही'' विचारत्या झाल्या. खरंच प्रसन्न वाटले एकदम. आमच्या सहप्रवासाची आनंदी सुरुवात झाली.

●क्रमशः

# यशस्वी होण्यासाठी - स्वतःशीही लढा

सुनील गवळी



आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात प्रत्येक विद्यार्थ्याला यश हवे आहे. परंतु यश मिळवण्यासाठी केवळ इच्छा किंवा प्रेरणा पुरेशी नसते; त्यासाठी स्वतःशी लढण्याची तयारी, शिस्त, स्पष्टता आणि आत्मपरीक्षण आवश्यक असते. ''स्वतःसाठी स्वतःशी लढा'' हा विचार केवळ प्रेरणादायी नसून तो जीवनाचे गूढ तत्त्व सांगणारा आहे. या तत्त्वांचा योग्य वापर केल्यास विद्यार्थी केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक, भावनिक आणि नैतिक दृष्ट्याही सक्षम होऊ शकतो.

सर्वप्रथम, शिस्तही यशाची पायाभूत गरज आहे. क्षणिक असते, पण शिस्त ही सातत्याने आपल्याला योग्य मार्गावर ठेवते. भगवद्गीतेत श्रीकृष्णांनी सांगितले आहे की, ''कर्म करत राहणे हेच खरे योग आहे.'' याचा अर्थ असा की, परिस्थिती कशीही असली तरी आपले कर्तव्य सातत्याने पार पाडणे हीच खरी साधना आहे. विद्यार्थ्यांनी दररोज ठराविक वेळेवर अभ्यास करणे, नियमित सवयी अंगीकारणे आणि वेळेचे नियोजन करणे हे शिस्तीचे लक्षण आहे. पालक आणि शिक्षकांनीही मुलांसमोर स्वतःच्या वर्तनातून शिस्तीचा आदर्श ठेवणे आवश्यक आहे.

दुसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे स्पष्टता विद्यार्थ्यांना ''मला काय व्हायचे आहे?'' आणि ''मी हे का करतो आहे?'' या प्रश्नांची उत्तरे माहीत असणे अत्यंत गरजेचे आहे. ध्येय स्पष्ट नसेल तर मन भटकते आणि ऊर्जा वाया जाते. स्वामी विवेकानंदांनी सांगितले आहे, ''ध्येय मिळेपर्यंत थांबू नका.'' हा संदेश विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहे. पालकांनी मुलांवर आपली अपेक्षा लादण्याऐवजी त्यांच्या आवडी, क्षमता आणि स्वप्नांना समजून घेतले पाहिजे, तर शिक्षकांनी त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांची दिशा निश्चित केली पाहिजे.

तिसरे तत्त्व म्हणजे बहाणे टाळणे आणि जबाबदारी स्वीकारणे. ''वेळ नाही'', ''परिस्थिती खराब आहे'' हे सर्व बहाणे प्रगतीत अडथळा ठरतात. रामायणातील श्रीरामांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही आपले कर्तव्य सोडले नाही. त्यांनी संकटांना संधीमध्ये रूपांतर केले. यावरून आपल्याला शिकायला मिळते की, खरा यशस्वी माणूस तोच असतो जो परिस्थितीला दोष न देता स्वतःमध्ये बदल घडवतो. विद्यार्थ्यांनी आपल्या चुका मान्य करून त्यातून शिकणे आवश्यक आहे. पालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना दोष देण्याऐवजी त्यांना आत्मपरीक्षणाची सवय लावली पाहिजे.

चौथे तत्त्व म्हणजे वेदनेचा स्वीकार. जीवनात येणाऱ्या अडचणी, अपयश आणि दुःख हे टाळण्यासारखे नसून शिकण्यासारखे असतात. भगवान बुद्धांच्या जीवनातही दुःखातूनच ज्ञानाचा उदय झाला. प्रत्येक अपयश हे पुढील यशाची तयारी असते. ''चे मध्ये रूपांतर करणे'' म्हणजेच आत्मविकास होय. विद्यार्थ्यांनी अपयशाला घाबरू नये, तर त्यातून धडा घेऊन अधिक सक्षम बनावे. पालक आणि शिक्षकांनी मुलांना मानसिक आधार देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे.

पाचवे आणि सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे सतत स्वतःला सुधारत राहणे. दररोज स्वतःला विचारणे की ''आज मी कालपेक्षा कसा चांगला झालो?'' हा आत्म विकासाचा मूलमंत्र आहे. महाभारतातील अर्जुन हा एकाग्रतेचा आदर्श आहे. त्याने सातत्याने सराव करून स्वतःला सर्वोत्तम बनवले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनीही सातत्याने प्रयत्न करून स्वतःमध्ये सुधारणा घडवली पाहिजे. पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांची इतरांशी तुलना न करता त्यांच्या प्रगतीचे कौतुक केले पाहिजे.

शेवटी, विद्यार्थ्यांच्या यशासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या तिघांचीही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी शिस्त, स्पष्टता आणि आत्मविश्वास अंगीकारला पाहिजे; पालकांनी प्रेम, संयम आणि समजूतदारपणा दाखवला पाहिजे; तर शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन, प्रेरणा आणि आदर्श दिला पाहिजे.

यश हे बाहेर कुठेच नसते; ते आपल्या विचारांमध्ये, सवयींमध्ये आणि कृतीत दडलेले असते. जो स्वतःवर विजय मिळवतो, तोच खऱ्या अर्थाने जग जिंकतो. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःशी लढायला शिकले पाहिजे, कारण हाच खरा यशाचा मार्ग आहे. **

# बाहेरील खाद्यपदार्थ आणि भारतीय मानसिकता

निलेश साठे

भारत हा विविध संस्कृती, परंपरा आणि खाद्यपदार्थांनी समृद्ध देश आहे. भारतीयांच्या जीवनशैलीत अन्नाला केवळ भूक भागवण्याचे साधन म्हणून पाहिले जात नाही, तर ते सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक नात्यांचा एक महत्त्वाचा भाग मानले जाते. त्यामुळेच बाहेरील खाद्यपदार्थांविषयी भारतीयांच्या मनात एक वेगळीच आकर्षणाची भावना दिसून येते. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक नागरिक घरगुती जेवणाऐवजी हॉटेल, फास्ट फूड सेंटर, रस्त्यावरील खाद्यपदार्थ आणि ऑनलाइन फूड डिलिव्हरीकडे वळताना दिसत आहेत. विशेषतः तरुण



वर्गामध्ये नवीन चवी, आधुनिक पदार्थ आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या खाद्यपदार्थांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. अनेकदा एखादा पदार्थ चविष्ट आहे की नाही यापेक्षा तो किती लोकप्रिय आहे, याला अधिक महत्त्व दिले जाते.

भारतीय मानसिकतेतील एक वैशिष्ट्य म्हणजे ''स्वस्त आणि चविष्ट'' या गोष्टीला दिले जाणारे प्राधान्य. अनेक नागरिक स्वच्छता, अन्नाची गुणवत्ता आणि आरोग्याच्या बाबींकडे दुर्लक्ष करून चव आणि कमी किंमत यांना जास्त महत्त्व देतात. त्यामुळे रस्त्यावरील अनेक खाद्यपदार्थांच्या ठिकाणी मोठी गर्दी दिसून येते. मात्र, याच ठिकाणी वापरले जाणारे पाणी, तेल, भाजीपाला किंवा स्वच्छतेचे निकष याबाबत अनेकदा प्रश्न उपस्थित केले जातात. दुसरीकडे, भारतीय समाजात पाहुणचाराला विशेष महत्त्व असल्याने बाहेर जेवायला जाणे ही एक सामाजिक प्रतिष्ठेची बाबही बनली आहे. वाढदिवस, कौटुंबिक कार्यक्रम, मित्रमंडळींच्या भेटी किंवा व्यावसायिक चर्चा यासाठी हॉटेल आणि रेस्टॉरंटची निवड केली जाते. त्यामुळे बाहेरील खाद्यसंस्कृतीचा विस्तार झपाट्याने होत आहे.तथापि, बाहेरील खाद्यपदार्थांचा वाढता वापर आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय ठरत आहे. जास्त तेलकट, मसालेदार आणि प्रक्रिया केलेले अन्न नियमित खाल्ल्याने लठ्ठपणा, मधुमेह, हृदयविकार आणि पचनासंबंधी समस्या वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे चवीसोबतच स्वच्छता आणि पोषणमूल्यांनाही तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.भारतीय मानसिकता बदलत असली तरी सजग ग्राहक बनणे ही काळाची गरज आहे. बाहेरील खाद्यपदार्थ खाणे चुकीचे नाही, परंतु त्यांची गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्यावरील परिणाम यांचा विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. चवीचा आनंद घेतानाच आरोग्याची काळजी घेणे हीच खऱ्या अर्थाने प्रगत आणि जबाबदार भारतीय मानसिकता ठरेल. **

# कोकणातील मान-सन्मान आणि विघ्नसंतोषी प्रवृत्तीची कीड



धनंजय शेटये

कोकणची भूमी म्हणजे निसर्गाचं वरदान आणि संस्कृतीचा सुवर्णकाळ! विशेषतः रणरणत्या मे महिन्याच्या उन्हात जेव्हा आंबे-काजूच्या सुवासाने अवघी सुष्टी न्हाऊन निघते, तेव्हा कोकणातील गावोगावी सांस्कृतिक उत्सवांची एक आगळीवेगळीच पर्वणी सुरू होते. हे उत्सव केवळ मनोरंजनाचे साधन नसून, गावातील अबालवृद्धांच्या मनात ऐक्याचा, आपुलकीचा आणि सोहार्दाचा ओलावा निर्माण करणारे जिवंत सोहळे असतात. ढोल-ताशांचा गजर, नाटकांचे पडदे आणि लोककलांच्या सादरीकरणाने संपूर्ण गाव एका सूत्रात बांधला जातो. या दिवसांत गावातील प्रत्येकाच्याच चेहऱ्यावर एक वेगळंच तेज आणि ओसंडून वाहणारा आनंद पाहायला मिळतो.

परंतु, याच सुवर्णकणाला कुठेतरी 'गावकारशाही' आणि 'मान-सन्माना'च्या अहंकाराची काळी कडा लागलेली असते. गाव म्हटलं की जशी गुण्यागोविंदाने राहणारी माणसं आली, तशीच स्वतःच्या अहंपणात जगणारी आणि मानापानाच्या चौकटीत अडकलेली 'थोर' मंडळीही आलीच!

अशाच एका देखण्या गावी एका दिमाखदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची शोभा उणावू नये आणि वेळेचा अपव्यय होऊन 'फाफटपसारा' वाढू नये, म्हणून आयोजक तरुणांनी अतिशय शिस्तबद्ध नियोजन केले होते. केवळ ठराविक, कर्तृत्ववान व्यक्तींचाच सत्कार करायचा आणि व्यासपीठाची प्रतिष्ठा राखायची, असे आधीच निश्चित झाले होते. त्याप्रमाणे मर्यादित सत्काराचे साहित्यही आणले गेले होते.

पण म्हणतात ना, ''विनाशकाले विपरीत बुद्धी!'' सत्कारमूर्तींच्या मांदियाळीत एका 'अतिउत्साही' महाभागाचा समावेश होता. स्वतःचा सत्कार होताच, त्यांच्यातील सुप्त अहंकार आणि 'मी म्हणजेच गाव' हा भाव जागा झाला. सर्व नियम आणि शिष्टाचाराला (प्रोटोकॉल) हरताळ फासत, त्यांनी थेट सूत्रसंचालकाच्या हातातील माईकच हिसकावून घेतला! आपल्या ओळखीच्या एका विशिष्ट व्यक्तीला व्यासपीठावर बोलावण्यासाठी त्यांनी उद्घोषणा सुरू केली. परंतु, समोरची व्यक्तीही काही कमी नव्हती. काही केल्या ती व्यासपीठावर येण्यास तयार होईना.

हा सगळा प्रकार पाहून त्या अतिउत्साही आणि विघ्नसंतोषी व्यक्तीचा पारा चढला. गावाची अब्रू चव्हाट्यावर आणत, सूत्रसंचालकाकडे रोखून पाहत ती व्यक्ती मालवणी ढंगात आणि त्राग्याने कडाडली.

''हयत्याचे काय डोळे फुटलले काय?? मिया इतको येळ तेका दिसाक नाय! आता माझे सत्कार करुन काय उपेग आसा. करुचो तेव्हा केलास नाय!''

वास्तविक पाहता, त्या निष्पाप आणि बिचाऱ्या सूत्रसंचालकाचा यात तीळमात्रही दोष नव्हता. तो तर केवळ आयोजकांच्या सूचनेनुसार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत होता. पण, स्वतःला गर्वाच्या शिखरावर समजणाऱ्या अशा व्यक्तींना याचे भान कुठे असते? अशा व्यक्ती म्हणजे एक नकारात्मक प्रवृत्ती असतात. प्रत्येक चांगल्या कार्यात खो घालणारी, स्वतः कधीही सहकार्य न करणारी आणि केवळ विघ्न निर्माण करण्यात धन्यता मानणारी एक प्रवृत्ती असते. संकुचित विचारसरणी, कमालीचा स्वार्थीपणा आणि अर्धवट ज्ञान हेच अशा लोकांचे खरे दागिने असतात. गावाच्या या सुंदर, सात्विक सोहळ्यात उगाचच वितंडवाद घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या महाभागाला अखेर आयोजक तरुणाईने आपल्या आक्रमक आणि खंबीर भूमिकेने चांगलीच समज दिली आणि वेळीच शांत केले. तरुण रक्ताच्या या समयसूचकतेमुळे पुढील अनर्थ टळला. अशा प्रकारची विघ्नसंतोषी आणि अहंकारी माणसे म्हणजे गावच्या सर्वांगीण विकासाला लागलेली सुप्त कीड आहे. वैयक्तिक मानापानासाठी संपूर्ण गावाच्या एकतेला आणि सामाजिकतेला गालबोट लावणाऱ्या अशा प्रवृत्तींचा जर वेळीच बंदोबस्त केला नाही, तर गावातील जुना कौटुंबिक जिव्हाळा, ऐक्य आणि नवतरुणांचा उत्साह कायमचा मातीमोल होईल. म्हणूनच, संस्कृतीच्या रक्षणासोबतच अशा विकृतींचे उच्चाटन करणे, ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. **

# वाचनीय जीवनानुभव...

## आभाळ आठवांचे




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

आभाळ आठवांचे, हे ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ, डॉ.विजया फडणीस यांचे दहावे पुस्तक, उत्कर्ष प्रकाशनने देखण्यारूपात प्रकाशित केले आहे. 'प्रास्ताविक'मध्ये डॉ. विजया फडणीस लिहितात, ''मी मूळची नागपूरची. लग्नानंतर ८-९ वर्षे अहमदाबादमध्ये वास्तव्य. तर १९८६ सालापासून पुण्यात मांजरी, हडपसर भागात वास्तव्य. या तिन्ही शहरांतील आठवणींवर आधारित लेख ''उरूस'' या पुस्तकात समाविष्ट झाले आहेत. उर्वरित लेख आता या पुस्तकात समाविष्ट होत आहेत.'' या पुस्तकात एकूण १९ लेख आहेत. पुस्तकाचे आकर्षक, रंगीत आणि काहीसे हटके मुखपृष्ठ अनंत फाटक यांचे आहे.

हरवलेले.... गवसलेले, या लेखात लेखिकेने विविध सहलीतील, बरोबरच्या प्रवाशांच्या, विशेषतः स्त्रियांच्या हरवलेल्या विविध वस्तू मिळाल्याचे आणि हरवल्याचे चटके ज्यांना बसले, त्यांना त्या परत केल्याचे विविध किस्से सांगितले आहेत. त्या बहुतेकांनी फडणीस दांपत्याला, वेळोवेळी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून, काहींनी भेट स्वरूपात काही वस्तूही दिल्या. परिणामी त्यांच्या घरात दहा-बारा गणपतीच्या मूर्ती विराजमान झाल्या आहेत. सहलीला जाणाऱ्या स्त्रियांनी पुरेशी काळजी घेणे आणि आपल्या मौल्यवान वस्तू जपणे किती आवश्यक असते, हे या लेखाद्वारे स्पष्ट होते. हरवलेल्या वस्तू, प्रत्येक वेळी फडणीस दांपत्यालाच मिळतील, याची खात्री कोण देणार? नाही का!

परीक्षा अन् अभ्यास, या लेखात परीक्षेसंबंधीच्या विविध आठवणी लेखिकेने जागविल्या आहेत. त्यांच्या घरातील वातावरण, घरातील वृद्ध आजीचे आजारपण, या परिस्थितीतही त्यांच्या सर्व भावंडांनी भरपूर अभ्यास करून उत्तम यश प्राप्त केले. त्यांना बुद्धीचे उत्तम वरदानही होते. निसटलेले, या लेखात स्वानुभवावर आधारित हुकलेल्या क्षणांची कैफियत मांडली आहे. पुण्यात निवड होऊनही शेवटी व्याख्यातापद न मिळाल्याने, त्यांनी स्वतःचे समुपदेशन केंद्र सुरू केले. आपला हा आवडीचा व्यवसाय, वयाची सत्तरी ओलांडल्यानंतरही, त्या यशस्वीपणे करीत आहेत. त्यांची अनुभवाधारित विविध पुस्तकेही वेळोवेळी प्रकाशित झाली. वास्तुशास्त्र या लेखांमध्ये वास्तुशास्त्रावर आधारित सल्ला देणारे, कशी फसवणूक करतात, हे लेखिकेने सोदाहरण स्पष्ट केले आहे. त्यामध्ये फसवणूक आणि अंधश्रद्धा जास्त, असे त्यांना वाटते. पालख्या आणि तन्नो लक्ष्मी प्रचोदयात या लेखांमध्ये लेखिकेने वारीच्या वेळचे पुण्यातील आणि अन्य ठिकाणचे अनुभव मांडले आहेत. नागपूरमधील माहेरच्या परंपरागत महालक्ष्म्यांचे, त्या काळातील विविध परंपरागत अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. शेवटी त्यांनीच हे मान्य केले आहे की, भक्तिभावामुळे ही प्रथा बंद करावी असे कुणालाही वाटत नाही. यामध्ये श्रद्धा आणि अंधश्रद्धेचा भागही असू शकतो.

'बंगली' या लेखात लेखिकेने आपल्या माहेरच्या, नागपूरमधील घराच्या विविध आठवणी सविस्तरपणे मांडल्या आहेत.

बदलते घरटे, या लेखामध्ये सध्याच्या काळातील कुटुंब व्यवस्थेतील, विविध प्रश्नांची चर्चा केली आहे. भारतातील जनगणनेत मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण कमी असल्याने, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाल्याने, परिणामी लग्नसंस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उच्च मध्यमवर्गीय घरांमध्ये आबालवृद्धांचे प्रश्न वाढत आहेत.अशा परिस्थितीत ज्यांची मुले आणि सुना परदेशात स्थायिक आहेत, त्यांचे आईवडील किंवा विहिणी एखाद्या शहरात, एकमेकांजवळ, सदनिका घेऊन एकत्र किंवा शेजारी राहून, भारतातच राहू इच्छिणाऱ्या ज्येष्ठांच्या समस्यांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ''लग्न एक यक्षप्रश्न'' मध्ये विवाह संस्थेतील वाढत्या क्लिष्ट समस्यांचे विविध पैलू स्पष्ट केले आहेत. त्यासाठी कोणते उपाय उपयुक्त ठरतील, त्याचेही स्पष्टीकरण लेखिकेने दिले आहे.

विपुलश्री बरोबरचे नाते, या लेखांमध्ये एक लेखिका म्हणून विपुलश्री या मासिकाबरोबर दीर्घकाळ कसे संबंध निर्माण झाले. त्यामुळे आपले लेखन कसे बहरले याचे सविस्तर विश्लेषण विजयाबाईंनी केले आहे. हा लेख नितांत वाचनीय झाला आहे. साप, कहाणी औट घटकेच्या राज्याची, पोपटांची दुनिया हे लेख लेखिकेच्या अनुभवावर आधारित आहेत. त्यातील काही अनुभव वाचकाला थक्क करतात. गुजराती भाषेच्या सानिध्यात, या लेखात, विवाहानंतर नागपूर सोडून, अहमदाबादला स्थलांतर केल्यावर आठ-नऊ वर्षांच्या तेथील मुक्कामात, त्यांची गुजराती भाषा सखी बनली. गुजराती भाषा शिकल्यामुळे त्यांना गुजराती साहित्याची ओळख झाली. त्यामुळे त्यांनी काही अनुवादाची कामेही केली. मात्र त्यानंतर गुजराती भाषेशी संबंध राहिला नाही. लेखिकेला याची आता खंत वाटते आहे. जागते रहो, या दीर्घ लेखात विजया यांनी बुद्ध्यांक आणि भावनांक यांची सविस्तर, सोदाहरण चर्चा केली आहे. भावनिक सजगता कौशल्ये प्राप्त करण्यासाठी, विविध उपायही सुचविले आहेत.

विजयायांनीआपल्यालेखणीनेकाहीव्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. आमच्या शालिनी काकू, या लेखातील काकूंच्या स्वभाववैशिष्ट्यांची जाणीव होते. त्यामधून त्यांच्या संयुक्त कुटुंबातील परस्परसंबंधांची आणि घरातील उत्तम वातावरणाची कल्पना येते. आता असे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध दुर्मीळ झाले आहेत. कर्मयोगिनी पद्मश्री शालिनीबाई मोघे, आणि करारी पण लोभस व्यक्तिमत्त्वाच्या कुसुमावती देशपांडे ही व्यक्तिचित्रे वाचनीय आणि प्रेरक आहेत. कहाणी बीएमजी, मध्ये सुरेश भट, सुधीर मोघे आणि कवी ग्रेस यांच्या व्यक्तिमत्त्वांबद्दल विजया यांनी आपले विचार मांडले आहेत.

डॉ. विजया फडणीस यांचे हे पुस्तक म्हणजे त्यांच्या जीवनातील विविध आठवणींचा, रंगीबेरंगी कॉलाझ् आहे. यामध्ये लेखिकेच्या उत्तम निरीक्षण शक्तीची जाणीव होते. ऊस तोडणी कामगारांच्या विविध प्रश्नांचीही जाणीव होते. पूर्वीच्या काळात विविध सणसमारंभ अनेक दिवस चालत असत. या चालीरिती पुढे चालू ठेवायच्या का, असा प्रश्न लेखिकेला पडतो. कारण या दीर्घकालीन धार्मिक परंपरा सांभाळताना, घरातील सर्व प्रौढ स्त्रियांना, प्रचंड अंगमेहनत करावी लागत असे आणि त्यातून साध्य काय होते, हाही एक प्रश्नच उरतो. काळानुसार त्यामध्ये बदल करणे अनिवार्य ठरते. ''आभाळ आठवांचे'' हे डॉ. विजया फडणीस यांचे पुस्तक नितांत वाचनीय आणि संग्राह्य आहे. या पुस्तकातून डॉ. विजया फडणीस यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. **

पुस्तकाचे नावः आभाळ आठवांचे
लेखिका : डॉ. विजया फडणीस
९८२२५५९८३७
प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन, पुणे-४
प्रथमावृत्ती : १ मार्च २०२६
पृष्ठे : १७१, किंमत : रू. ३००/-

# प्रज्ञेच्या बळाचा नवा सुलतान!

**वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी ग्रँडमास्टर झालेल्या आर. प्रज्ञानंदने जागतिक बुद्धिबळात भारताचा तिरंगा फडकावला. कौटुंबिक संघर्ष करताना आईच्या खंबीर साथीच्या जोरावर त्याने जर्मनीच्या बलाढ्य व्हिन्सेंट कीमरला पराभूत करत ऐतिहासिक नॉर्वे चेस स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय क्रीडापटू म्हणून बहुमान मिळवला. त्याचे कौशल्य आणि विजिगीषू वृत्ती अवघ्या जगाला थक्क करणारी ठरली. त्याचे बुद्धिबळातील कौशल्य चितारणारा लेख.**



शंतनु चिंचाळकर

नॉर्वे चेस स्पर्धेतील भारताच्या आजवरच्या कामगिरीचा विचार केल्यास एका खेळाडूशिवाय कोणी चमकदार कामगिरी केलेली नाही हे लक्षात येते. जगातील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि कठीण अशा या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व प्रामुख्याने पाच वेळचे जागतिक विजेते विश्वनाथन आनंद यांनी केले आहे. २०१३ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेत आनंद यांनी जगातील सर्वोत्तम खेळाडूंना वेळोवेळी तगडी झुंज दिली. २०१९ आणि २०२२ च्या आवृत्त्यांमध्ये त्यांनी चमकदार कामगिरी करत तिसरे स्थान पटकावले होते, परंतु या स्पर्धेच्या जेतेपदाने भारताला आजवर नेहमीच हुलकावणी दिली. या स्पर्धेत भारताचा खरा सुवर्णकाळ २०२६ च्या स्पर्धेने लिहिला गेला. युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने या स्पर्धेत केवळ पदार्पणच केले नाही, तर दहाव्या आणि अंतिम फेरीमध्ये जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरचा पराभव करून नॉर्वे बुद्धिबळ २०२६ स्पर्धा जिंकली. प्रज्ञानंदच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताचे या स्पर्धेतील जेतेपदाचे प्रदीर्घ काळचे स्वप्न अखेर पूर्ण झाले आणि जागतिक बुद्धिबळाच्या पटावर भारताचे वर्चस्व अधोरेखित झाले. भारताचा युवा ग्रँडमास्टर रमेशबाबू प्रज्ञानंद याने आपल्या अद्भूत आणि दमदार खेळाच्या जोरावर बुद्धिबळजगतात एक नवा इतिहास रचला आहे. नॉर्वे चेस ही जागतिक बुद्धिबळ क्षेत्रातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठित स्पर्धा मानली जाते. २०१३ पासून सुरू झालेल्या या स्पर्धेत जगातील सर्वोत्तम दहा खेळाडूंनाच निमंत्रित केले जाते. ही स्पर्धा खेळाडूंसाठी अत्यंत कठीण मानली जाते, कारण प्रत्येक फेरीत जगातील सर्वोत्तम खेळाडूशी सामना होतो. अशा रणभूमीत प्रज्ञानंदने मिळवलेले यश त्याच्या खडतर प्रवासाचे फलित आहे.

नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा २०१३ पासून सुरू झाली असून, महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद तसेच विद्यमान विश्वविजेता डी. गुकेश यांनाही या स्पर्धेचे विजेतेपद मिळवता आलेले नाही. भारताचे पाच वेळचे जागतिक विजेते विश्वनाथन आनंद यांनी यापूर्वी येथे अनेकदा झुंज दिली, परंतु स्पर्धेचे जेतेपद मिळवणे भारतासाठी आजवर स्वप्नच राहिले होते. अशा आव्हानात्मक स्पर्धेत जगज्जेत्यांना धूळ चारत प्रज्ञानंदने विजेतेपदावर आपले नाव कोरले आणि तो ही स्पर्धा जिंकणारा पहिलाच भारतीय बुद्धिबळपटू ठरला. आर. प्रज्ञानंदने रचलेला इतिहास अभूतपूर्व आहे. त्याने केवळ स्पर्धा जिंकली नाही, तर पाच वेळच्या जागतिक विजेत्या मॅग्नस कार्लसनला त्याच्याच मायभूमीत, एकाच स्पर्धेत तब्बल दोनदा पराभवाचा धक्का दिला. प्रज्ञानंदच्या या विजयाने जागतिक बुद्धिबळात भारताचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. बुद्धिबळाच्या पटावर रशिया आणि युरोपियन देशांची असलेली जुनी मक्तेदारी मोडून काढत, या १८ वर्षांच्या भारतीय तरुणाने जागतिक व्यासपीठावर भारताची ताकद आणि बौद्धिक क्षमता दाखवून दिली आहे. हा ऐतिहासिक विजय भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी एक सुवर्णक्षण ठरला आहे. या स्पर्धेत प्रज्ञानंदचा खेळ कमालीचा आक्रमक आणि तितकाच संयमी होता. स्पर्धेच्या सुरुवातीलाच त्याने अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनला क्लासिक डावात पराभूत करून खळबळ उडवून दिली. कार्लसन आपल्याच देशात पराभूत झाल्याने क्रीडाजगतात प्रज्ञानंदचे प्रचंड कौतुक झाले. परंतु, प्रज्ञानंद एवढ्यावरच थांबला नाही.

स्पर्धेच्या उत्तरार्धात जेतेपदासाठी कमालीचा मानसिक दबाव असताना त्याने पुन्हा एकदा कार्लसनला आर्मागेडन (टायब्रेकर) डावात पराभूत करत आपली परिपक्वता आणि पोलादी मनोधैर्य दाखवून दिले. केवळ कार्लसनच नव्हे, तर जगातील इतर सर्वोत्तम खेळाडूंचाही एकेक करून पाडाव करत त्याने गुणतालिकेत अव्वल स्थान गाठले आणि अत्यंत दिमाखात जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अंतिम दिवसाची सुरुवात १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावरून करणाऱ्या प्रज्ञानंदने अत्यंत महत्त्वाच्या क्षणी उत्कृष्ट खेळ दाखवला. त्याने क्लासिकल प्रकारातील विजय मिळवत तीन पूर्ण गुणांची कमाई केली आणि एकूण १८ गुणांसह एलिट बुद्धिबळातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या किताबांपैकी एकावर नाव कोरले. पांढऱ्या मेहऱ्यांनी खेळताना, प्रज्ञानंदने खेळाच्या मधल्या टप्प्यात कीमरच्या चुकांचा पुरेपूर फायदा घेतला आणि ४५ व्या चालीमध्ये आपल्या वर्चस्वाचे रूपांतर एका निर्णायक विजयात केले. या विजयामुळेत्याने१८गुणांचीकमाईकरतगुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. त्याने अमेरिकेच्या वेस्ली सो याच्यापेक्षा एक गुण अधिक मिळवला आणि विजेतेपदासह एक लाख डॉलर्सचे सर्वोच्च पारितोषिकही आपल्या नावे केले. या प्रतिष्ठित स्पर्धेचा विजेता होणारा तो पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. वेस्ली सो आणि अलीरेझा फिरुझा यांच्यातील सामना बरोबरीत सुटल्यामुळे सोच्या विजेतेपदाच्या आशा मावळल्या; त्यानंतर सलग चार क्लासिकल सामने जिंकून २० वर्षीय प्रज्ञानंदने स्पर्धेत अव्वल स्थान गाठले. प्रज्ञानंदने जागतिक विजेता देशबांधव डी. गुकेशचा पराभव करून सोच्या पाठोपाठ दुसरे स्थान गाठले होते.

प्रज्ञानंदच्या या स्पर्धेतील कामगिरीमध्ये नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेचा सात वेळचा विजेता आणि जागतिक क्रमवारीमध्ये अव्वल स्थानी असलेल्या मॅग्नस कार्लसनचा क्लासिकल प्रकारात दोनदा पराभव करण्याचा समावेश होता. या कामगिरीमुळे एकाच स्पर्धेत कार्लसनला दोनदा हरवणारा तो इतिहासातील केवळ तिसरा खेळाडू ठरला; याआधी विश्वनाथन आनंद (लिनेरेस-मोरेलिया २००७) आणि वेसेलिन टोपालोव्ह (बिल्बाओ मास्टर्स ग्रँड स्लॅम फायनल २००८) यांनी अशी कामगिरी केली होती. १० ऑगस्ट २००५ रोजी चेन्नईत जन्मलेल्या प्रज्ञानंदचा ग्रँडमास्टर बनण्यापर्यंतचा प्रवास प्रचंड कष्ट, जिद्द आणि त्यागाने भरला आहे. एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या प्रज्ञानंदला मोठी बहीण वैशाली (महिला ग्रँडमास्टर)मुळे बुद्धिबळाची गोडी लागली. प्रज्ञानंदचे वडील रमेशबाबू हे पोलिओग्रस्त असून बँकेत व्यवस्थापक म्हणून काम करतात. सुरुवातीच्या काळात घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने प्रज्ञानंद आणि वैशाली या दोघांच्याही प्रशिक्षणाचा, महागड्या साहित्याचा आणि आंतरराष्ट्रीय परदेशी दौऱ्यांचा खर्च पेलणे कुटुंबासाठी अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक होते. अशा परिस्थितीत आई नागलक्ष्मी प्रज्ञानंदच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहिली. प्रज्ञानंदच्या यशामागे त्याची कठोर मेहनत आणि रोज आठ ते दहा तास सतत बुद्धीला दिलेली चालना आहे. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी तो जगातील सर्वात तरुण इंटरनॅशनल मास्टर बनला, तर वयाच्या १२ व्या वर्षी ग्रँडमास्टर झाला. या प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत खेळण्याची प्रज्ञानंदची ही दुसरी वेळ होती.

सहा खेळाडूंच्या एलिट गटात प्रज्ञानंदची सुरुवात काहीशी संथ झाली होती; मात्र स्पर्धेच्या उत्तरार्धात त्याने वेग पकडत सलग चार विजय मिळवले. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत तब्बल सात वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या आणि जगातील अव्वल खेळाडू मॅग्नस कार्लसनचा प्रज्ञानंदने या स्पर्धेत दोनदा पराभव करून आपल्या क्षमतेची प्रचिती दिली. 'या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रज्ञानंदचे हार्दिक अभिनंदन! हा खरोखरच एक अविश्वसनीय टप्पा असून प्रज्ञानंदच्या सातत्यपूर्ण उत्कृष्टतेची साक्ष देतो. त्याच्या भविष्यातील वाटचालीसाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा.' या शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचे अभिनंदन केले. तर 'या निकालामुळे मी खूप आनंदी आहे. विशेषतः ज्या पद्धतीने हे यश मिळाले, त्याबद्दल अधिक आनंद वाटतो. सलग चार सामने जिंकणे आणि शेवटच्या स्थानावरून पुनरागमन करत विजेतेपद मिळवणे याची चार दिवसांपूर्वी कल्पनाही केली नव्हती. आतापर्यंत मिळालेल्या सर्व विजयांमध्ये या स्पर्धेतील विजय सर्वोच्च ठरेल', अशा भावपूर्ण शब्दात प्रज्ञानंदने आपल्या ऐतिहासिक विजयाचे वर्णन केले. आर. प्रज्ञानंदचा हा थक्क करणारा प्रवास भारतातील नव्या दमाच्या बुद्धिबळपटूंसाठी यशाचा एक उत्तम वस्तुपाठ आहे. आजच्या आधुनिक आणि गतिमान डिजिटल युगात, सोशल मीडिया तसेच मनोरंजनाचे शेकडो पर्याय लक्ष विचलित करण्यासाठी उपलब्ध असताना स्वतःला या सगळ्यापासून पूर्णपणे दूर ठेवणे अत्यंत कठीण असते. मात्र, प्रज्ञानंदने केवळ आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले.

कौटुंबिक किंवा आर्थिक आव्हाने तसेच कोणतीही शारीरिक प्रतिकूलता तुमच्या यशाच्या मार्गात कधीही अडथळा ठरू शकत नाही, हे त्याने आपल्या कर्तृत्वाने जगाला दाखवून दिले आहे. नवीन पिढीतील उदयोन्मुख खेळाडूंनी प्रज्ञानंदकडून कठोर आत्मशिस्त आणि बुद्धिबळाच्या पटावर रोज खडतर मेहनत घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. सामन्यादरम्यान येणाऱ्या मानसिक दबावाचा आणि अपयशाचा धैर्याने सामना करण्याबाबतचा धडा त्याच्या जीवनशैलीतून मिळतो. जागतिक कीर्तीच्या बलाढ्य खेळाडूंसमोर खेळतानाही कमालीचा संयम, अचूक आक्रमकता आणि मानसिक संतुलन राखल्यास अशक्य वाटणारे कडेही सर करता येतात, हीच सर्वात मोठी प्रेरणा देशातील तरुण खेळाडूंनी घेतली पाहिजे. प्रज्ञानंदचे हे जागतिक यश आगामी काळात भारतात बुद्धिबळाची नवी लाट निर्माण करेल आणि अनेक नवे ग्रँडमास्टर्स घडवण्यास नक्कीच मार्गदर्शक ठरेल. **

## मी रक्तदाता

''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' असे म्हटले जाते. कारण रक्ताला कोणताही कृत्रिम पर्याय उपलब्ध नाही. एखाद्या अपघातग्रस्त रुग्णाला, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी, कर्करोगग्रस्त रुग्णाला, थॅलेसेमिया असलेल्या बालकाला किंवा प्रसूतीदरम्यान रक्तस्त्राव झालेल्या मातेला रक्ताची आवश्यकता भासते. अशा वेळी रक्तदात्याने दिलेले रक्त त्या रुग्णासाठी नवजीवन देणारे ठरते. जागतिक आरोग्य संघटनेच्या पुढाकाराने दरवर्षी १४ जून हा दिवस ''जागतिक रक्तदाता दिन'' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश स्वेच्छेने आणि नियमितपणे रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा सन्मान करणे तसेच समाजात रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. रक्तदान ही एक सुरक्षित, सोपी आणि समाजोपयोगी प्रक्रिया आहे. निरोगी व्यक्ती साधारणपणे दर तीन महिन्यांनी रक्तदान करू शकते. रक्तदानामुळे शरीरावर कोणताही वाईट परिणाम होत नाही. उलट समाजसेवेचे समाधान मिळते आणि एखाद्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचविण्याचे पुण्य लाभते. रक्तपेढीमध्ये कार्यरत अधिपरीचारक म्हणून मला दररोज रक्ताच्या गरजेचे महत्त्व जवळून पाहण्याची संधी मिळते. अनेक रुग्णांचे जीवन केवळ वेळेवर उपलब्ध झालेल्या रक्तामुळे वाचलेले मी अनुभवले आहे. त्यामुळे प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. आजच्या या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त आपण सर्वांनी स्वेच्छेने रक्तदान करण्याचा आणि इतरांनाही रक्तदानासाठी प्रेरित करण्याचा निर्धार करूया. आपल्या एका रक्तदानामुळे तीन रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे ''रक्तदान करा, जीवन वाचवा'' हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचवूया.

**– वैभव कांबळे**
अधिपरीचारक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय

विनायक दळवी

# मनू-जसपालची भागीदारी तुटली

ऑलिंपिक स्पर्धेची सुरुवात आणि भारताला धडाधड पदके मिळायला सुरुवात झाली, असं फार क्वचितच घडलंय. मात्र, पॅरिस ऑलिंपिकला हे घडलं होतं. नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरने पहिल्या दोन दिवसांत दोन ऑलिंपिक पदकं भारताला मिळवून दिली. त्यामुळे भारताचं खातं पहिल्याच दिवशी उघडलं. यावेळी मनू भाकरला पदकापर्यंत नेणारा तो प्रशिक्षक होता, जसपाल राणा.



स्वतः खेळत असताना भारताला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अनेक पदकं मिळवून देणारा नेमबाज जसपाल राणा. पदक जिंकण्यासाठी काय काय करावं लागतं याची त्याला पूर्ण जाणीव होती. म्हणून त्याने मनू भाकरला ऑलिंपिक पदकांपर्यंत नेलं. लॉस एंजलिसला त्यापेक्षाही आणखी काही मोठं करण्याची तयारी ही जोडगोळी करत होती. आणि अचानक जसपाल राणाच्या मृत्यूची बातमी आली. जसपाल राणा यांचे, अलीकडेच हृदयविकाराच्या झटकामुळे निधन झालं. त्यामुळे भारताची ऑलिम्पिक पदकं मिळवणारी एक जोडगोळी किंवा त्यांची भागीदारी संपुष्टात आली. त्याचबरोबर भारतीय क्रीडाक्षेत्रही पोरकं झालं.

मनू भाकर सारख्या गुणवत्तावान खेळाडूला ऑलिंपिक पदक मिळवण्यापर्यंत प्रेरकशक्ती देणारा जसपाल, स्वतः एक मोठा आंतरराष्ट्रीय नेमबाज होता. पॅरिस ऑलिंपिकला दोन पदकं मिळवल्यानंतर मनू भाकर तिसऱ्या ऑलिंपिक पदकापर्यंत देखील पोहोचली होती. मात्र, आधीच्या टोकियो ऑलिंपिक आणि पॅरिस ऑलिंपिक या दरम्यानचा प्रवास खडतर आणि विस्मयकारक होता.

ऑगस्ट २०२१ मध्ये टोकियो येथे ऑलिम्पिक नेमबाजी स्पर्धा नुकतीच संपली होती आणि मनू भाकर व जसपाल राणा यांच्यातील जाहीर वाद चर्चेचा विषय बनला होता. सौरभ चौधरीसोबत पदक जिंकण्याची शक्यता असलेली भाकर ते करू शकली नाही. त्यावेळी त्याला, सतत ट्रोलिंग व ऑनलाइन शिवीगाळीचा सामना करावा लागला. एका १८ वर्षांच्या मुलासाठी हे एक दुःखदस्वप्न होते. दुसरीकडे, जसपाल फारशा खेळाडूंना प्रशिक्षण देत नव्हता आणि ही परिस्थिती सर्वांसाठीच अप्रिय होती. आम्हाला अशा कोणाची तरी गरज होती जो परिपक्वता दाखवून त्या दोघांना एकत्र आणेल. भारतासाठी खेळाडू आणि प्रशिक्षक एकत्र असणे आवश्यक होते, कारण तरच पॅरिस ऑलिम्पिक शक्य होऊ शकले असते. अखेरीस सुबुद्धीचा विजय झाला आणि दीड वर्षानंतर, मनू आणि जसपाल यांनी आपापसातील वाद मिटवून भागीदारी केली. त्या भागीदारीने भारताला दोन पदकं मिळवून दिली आणि तिसरे पदक मिळवण्याच्या उंबरठ्यावर होती, परंतु अखेरीस शूटआऊटमध्ये ती गमावली. ही भागीदारी आणखी अनेक पदकं मिळवून देईल असे वाटत होते, परंतु दुर्दैवाने हृदयविकाराच्या झटक्याने भारताने जसपालला गमावले. भारतीय क्रीडा जगतासाठी हे एक मोठे नुकसान आहे. तो केवळ एक नेमबाज म्हणून प्रतिभावानच नव्हता, तर एक उत्कृष्ट प्रशिक्षकही होता, हे पॅरिसमध्ये स्पष्ट झाले होते, जेव्हा त्याने मनूला ऑलिम्पिकमध्ये यश मिळवून दिले. ही खरी गुरू-शिष्य परंपरा होती जी यशस्वी ठरली आणि एकमेकांच्या क्षमतेवरील आंधळा विश्वास हे या नात्याचे प्रमुख वैशिष्ट्य होते. टोकियोनंतर, मनूला खेळात आनंद मिळत नव्हता. तिच्याकडे प्रतिभा नेहमीच होती, परंतु तिच्यात एकाग्रतेची कमतरता होती. तिला योग्य दिशा दाखवण्यासाठी कोणाची तरी गरज होती आणि तिथेच जसपालची भूमिका सुरू झाली. निवृत्तीचा विचार करण्यापासून ते जसपालसोबत संघात सामील होण्यापर्यंत, मनूसाठी सर्व काही बदलले.

''आम्ही भारतासाठी काहीतरी विशेष साध्य करण्यासाठी निघालो होतो. मला आनंद आहे की, आम्ही दोन कांस्यपदकं जिंकली आणि तिसरे पदक थोडक्यात हुकले. मात्र, तिने चांगली नेमबाजी केली आणि तिच्या प्रयत्नांचा सर्वांना अभिमान वाटला पाहिजे. जेव्हा तुम्ही त्या रेषेवर उभे राहता आणि शूट-ऑफ करता, तेव्हा तुमच्या मनात काय चालले असते हे मी खरोखर सांगू शकत नाही. मी फक्त एवढेच म्हणू शकतो की, ते सोपे नाही. तसेच, मला आनंद आहे की ती लॉस एंजलिस ऑलिंपिक २०२८ साठी प्रशिक्षण घेण्यास तयार झाली, त्यामुळे आत्तापासून काही आठवड्यांत सर्व काही त्यासाठीच असेल,'' असे जसपाल पॅरिस स्पर्धा संपल्यानंतर लगेचच, आम्हा भारतीय क्रीडा पत्रकारांसोबत गप्पा मारताना म्हणाला होता. मनू भाकर अल्लड, हट्टी आणि बेफिकीर होती. गुणवत्तेला ती न्याय देत नव्हती. या सर्व गोष्टी एका साच्यात बसवून, त्यातून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हे महाकठीण कार्य, जसपाल राणाकडे होतं. जे त्याने यशस्वीरित्या पूर्ण करून दाखवलं. यावेळी भारतासाठी, मनू आणि जसपाल पुन्हा एकदा एका ध्येयाच्या शोधात होते. लॉस एंजलिस ऑलिंपिक २०२८ पर्यंतचा प्रवास त्यांनी योजनाबद्ध प्रशिक्षण कार्यक्रमानुसार आखला होता. आता यापुढे मनूला जसपालसाठी हे करावं लागेल आणि हे सुनिश्चित करावं लागेल की, तो स्वर्गातून हे पाहील आणि त्याला पूर्ण अभिमान वाटेल.

# यजमान इंग्लंडचा दणदणीत विजय

## • डॅनियल वॅट हॉजची शतकी खेळी • श्रीलंकेवर ८७ धावांनी मात

| बर्मिंगहॅम | वृत्तसंस्था |

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेला जोरदार सुरुवात झाली आहे. यंदा विश्वचषक स्पर्धेच्या आयोजनाचा मान इंग्लंडकडे आहे. या स्पर्धेतील पहिलाच सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. यावेळी इंग्लंडने श्रीलंकेवर ८७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. तसेच, पहिल्याच सामन्यात इंग्लंडची सलामीवीर फलंदाज डॅनियल वॅट हॉजने शतकी खेळी केली. विशेष म्हणजे डॅनियल वॅट हॉज हिने २३ दिवसांपूर्वीच बाळाला जन्म दिला आहे. त्यामुळे तिचे हे शतक आणखी खास ठरले आहे. या शतकी खेळीसह ती महिला टी- २० विश्वचषक स्पर्धेत शतक



झळकावणारी सातवी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

आयसीसी महिला टी-२० विश्वचषकातील पहिलाच सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात खेळवला गेला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या सलामीवीर डॅनी व एमी यांनी १३५ धावांची भागीदारी केली. मात्र, एमी ५३ धावांवर बाद झाली. त्यानंतर डॅनी व नॅट ही जोडी मैदानावर उभी राहिली.

या दोघींनी संघाला १ बाद २१९ धावांपर्यंत पोहोचवले. यावेळी डॅनी १०५ धावांवर नाबाद राहिली, तर नॅटनेही नाबाद ४६ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ १३२ धावांत तंबूत परतला. यावेळी निलाशिका सिल्वा (३९) हिने संघासाठी सर्वाधिक धावा केल्या. मात्र, इतर खेळाडूंना काही खास कामगिरी करता आली नाही. यावेळी इंग्लंडची गोलंदाज फ्रेया केम्पने २२ धावांत ४ बळी घेतले. तर, चार्ली डीन व सोफी एस्क्लेस्टन यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. यासह इंग्लंडने हा सामना ८७ धावांनी आपल्या नावावर केला.

### बेबी रॉक सेलिब्रेशन

डॅनियल वॅट हॉजच्या घरी गेल्या महिन्यातच चिमुकलीचे आगमन झाले आहे. दि.२० मे रोजी तिने मुलीला जन्म दिला. त्यानंतर महिनाही झालेला नसताना ती मैदानात उतरली आणि आपल्या देशासाठी टी-२० विश्वचषक खेळताना शतक झळकावले आहे. तिने शेवटच्या षटकात चौकार खेचून आपले शतक पूर्ण केले. दरम्यान, शतक पूर्ण केल्यानंतर तिने आपल्या मुलीसाठी खास सेलिब्रेशन केले. या सेलिब्रेशनला ''बेबी रॉक सेलिब्रेशन'' असे म्हणतात. डॅनियलने आपल्या मुलीचे नाव डेजी असे ठेवले आहे. या शतकी खेळीसह तिने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. हे शतक तिने वयाच्या ३५ व्या वर्षी पूर्ण केले आहे. यासह ती टी-२० विश्वचषक स्पर्धेत शतक झळकावणारी सर्वात वयस्कर महिला खेळाडू ठरली आहे.

# फिफामध्ये यजमानांचा दबदबा

| लॉस एंजेलेस | वृत्तसंस्था |

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या दिवसाच्या खेळात अमेरिकेने ग्रुप 'ड' च्या लढतीत पॅराग्वेवर ४-१ असा दणदणीत विजय मिळवला. तसेच, सहयजमान कॅनडाने पराभव टाळताना बोस्निया अँड हर्झेगोव्हिनाविरुद्धचा सामना १-१ असा बरोबरीत राखला. क्ले लॉरिनने ७८व्या मिनिटाला केलेला गोल हा कॅनडाचा पराभव टाळण्यासाठी पुरेसा ठरला.



तत्पूर्वी, जोव्हो लुकिचने बोस्नियाला आघाडी मिळवून दिली होती. कॅनडाने या सामन्यात विजयासाठी सर्व जोर लावला होता; परंतु, त्यांना बरोबरीवर समाधान मानावे लागले. दुसरीकडे अमेरिकेने पॅराग्वेचा फडशा पाडला. ७व्या मिनिटाला डॅमियन बोबाडिल्लाच्या स्वयंगोलने अमेरिकेला १-० अशी आघाडी मिळवून दिली. ती भरून काढण्यासाठी पॅराग्वेला ७३ व्या मिनिटाला मॉरिसिओच्या गोलची वाट पाहावी लागली; परंतु, तोपर्यंत अमेरिकेकडून दोन अधिकचे गोल झाले होते. फोलारिन बॅलोगन याने दोन गोल करून अमेरिकेला पहिल्या हाफमध्येच ३-० अशी आघाडी मिळवून दिली होती. अमेरिकेसाठी चौथा गोल २३ वर्षीय जिओवॅन्नी रेनाने केला. त्याने भरपाई वेळेच्या ८व्या मिनिटाला अप्रितम गोल करून अमेरिकेचा ४-१ असा विजय पक्का केला.

# भारतीय संघात दोघांचे पदार्पण

**नवी दिल्ली :** भारत आणि अफगाणिस्तान संघात एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना शनिवारी (दि.१३) खेळवला गेला. पावसामुळे हा सामना प्रत्येकी २५ षटकांचा झाला. दरम्यान, या सामन्यासाठी भारताने दोन खेळाडूंना एकदिवसीय सामन्यात पदार्पणाची संधी दिली आहे. विदर्भाच्या हर्ष दुबेसह गुरनूर ब्रार यांचे या सामन्यातून भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण झाले आहे. ते भारतासाठी एकदिवसीय पदार्पण करणारे २६१ आणि २६२ वे खेळाडू ठरले आहेत.

# दिशा अबॅकसच्या मुलांचे यश

| महाड | प्रतिनिधी |

मलेशिया येथे दि.४ जून रोजी अबॅकस स्पर्धा पार पडल्या. यामध्ये १२ देशांनी एकूण ३ हजार विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. जानेवारीत झालेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेमधून या मुलांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेत पहिला पेपर ५ मिनिटांत १२० गणिते बेरीज आणि वजाबाकी हा होता. दुसरा पेपर ५ मिनिटांत १२० गणित बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार हा होता. असे दोन्ही पेपर मिळून महाडच्या दिशा अबॅकसने चॅम्पियन चषकात बाजी मारली. यावेळी जय शितोळे, धनदा अवसरे, इरा शेठ या मुलांनी हे यश मिळवत महाडसह रायगड जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. आजपर्यंत तैवान, व्हियेतनाम, भारत आणि मलेशिया येथे आयोजित अबॅकस स्पर्धेत दिशा अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी सातत्याने देदप्यमान यश मिळवले आहे. या मुलांना दिशा अबॅकसच्या संचालिका भारती वडाळकर आणि सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सर्व स्तरातून या मुलांवर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# ब्राझिलची सुरूवात नेयमार विना

| न्यूयॉर्क | वृत्तसंस्था |

ब्राझिलला फिफा विश्वचषक स्पर्धेच्या मोहीमेची सुरुवात नेयमार ज्युनियर शिवाय करावी लागणार आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी या वृत्ताला दुजोरा देताना 'क' गटातील मोरोक्कोविरुद्धच्या सामन्यात नेयमार खेळणार नसल्याचे स्पष्ट केले. पाचवेळच्या विश्चचषक विजेता ब्राझील २०२२च्या विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारणाऱ्या मोरोक्कोला शनिवारी न्यू यॉर्कच्या न्यू जर्सी स्टेडियमवर भिडणार आहे. परंतु, पोटरीच्या दुखापतीमुळे नेयमारच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील



बहुप्रतिक्षित पुनरागमनाला विलंब झाला आहे. सामन्यापूर्वी बोलताना अँसेलोटी यांनी सांगितले की, नेयमार दुखापतीतून सावरण्यात चांगली प्रगती करत आहे. लवकर बरा होण्यासाठी तो खूप मेहनत घेत आहे. आम्ही त्याला केवळ त्याच्या निर्विवाद फुटबॉल कौशल्यासाठीच नव्हे, तर संघातील तरुण खेळाडूंना तो देऊ शकणाऱ्या अनुभवासाठी बोलावले आहे.

# हार्दिक पांड्याचे पुनरागमन कधी?

**नवी दिल्ली :** हार्दिक पांड्याच्या क्रिकेट कारकिर्दीवर सध्या संकटाचे सावट आहे. तो सध्या भारतीय संघातील कोणत्याही फॉरमॅटमध्ये खेळत नाही. हार्दिक बऱ्याच काळापासून कसोटी क्रिकेट खेळलेला नाही, आता तो एकदिवसीय संघातूनही अचानक बाहेर झाला आहे आणि आगामी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठीही त्याची निवड झालेली नाही. त्यामुळे हार्दिक पुन्हा कधी पुनरागमन करणार, याबद्दल आताच काही सांगता येणार नाही. त्याने मार्च २०२६ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटचा टी-२० सामना खेळला होता.

# आशीर्वाद सूर्यवंशीची शतकी खेळी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताचा १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आपल्या स्फोटक फलंदाजीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने यंदाच्या आयपीएल हंगामात आपल्या फलंदाजीच्या जोरावर अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. त्याच्या लक्षणीय कामगिरीसाठी त्याला अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. मात्र, आता त्याच्या १० वर्षीय लहान भावाची चर्चा होत आहे. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी आंतरराष्ट्रीय स्तरावर सतत चर्चेत असतो, तर आता दुसरीकडे त्याचा भाऊ आशीर्वाद सूर्यवंशीने आपल्या फलंदाजीने सगळ्यांचे




लक्ष वेधून घेतले आहे. अवघ्या १० वर्षांच्या आशीर्वाद सूर्यवंशीने समस्तीपूरमधील एका स्थानिक सराव सामन्यात शानदार शतक झळकावून कुटुंबातून आणखी एक प्रतिभावान क्रिकेटपटू उदयास येऊ शकतो, असा संकेत दिला आहे. क्रिकेट अकादमी ताजपूरचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आशीर्वादने केवळ ८७ चेंडूत १०३ धावांची खेळी केली. त्याच्या या खेळीत २० चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. त्याने ११८.३९ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या.

# सिंधूची उपांत्य फेरीत धडक

| सिडनी | वृत्तसंस्था |

दोन वेळची ऑलिंपिक पदकविजेती पी.व्ही. सिंधू हिने ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० या बॅडमिंटन स्पर्धेतील महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. तर, युवा खेळाडू तन्वी शर्मा हिचे मात्र पराभवामुळे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. भारताची स्टार शटलर पी. व्ही. सिंधू हिला या स्पर्धेत तिसरे मानांकन देण्यात आले आहे. शुक्रवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीतील सामन्यात सिंधूने चीन तैपईच्या चेन सू यू हिचा २१-६, २१-९ असा एकतर्फी पराभव केला. संपूर्ण सामन्यात सिंधूने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी खेळाडूला फारशी संधी दिली



नाही. अवघ्या २७ मिनिटांत हा सामना जिंकत तिने उपांत्य फेरीत धडक मारली. आता पुढील फेरीत सिंधूसमोर जपानच्या अकाने यामागुची हिचे आव्हान असणार आहे. या सामन्याकडे बॅडमिंटन चाहत्यांचे विशेष लक्ष लागले आहे. दुसरीकडे, भारताची युवा खेळाडू तन्वी शर्मा हिला मात्र पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे तिचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.

# अफगाणिस्तान संघाला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामन्यानंतर आता ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना शनिवारी दि.१३ जूनपासून सुरू झाला आहे. मात्र, मालिका सुरू होण्यापूर्वीच अफगाणिस्तान क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा धडाकेबाज फलंदाज दरविश रसूली याच्या वडिलांचे निधन झाले आहे. ही बातमी मिळताच हा खेळाडू तातडीने मायदेशी रवाना झाला आहे.

# इंग्लंडच्या सराव किटवर डल्ला

| कॅन्सस | वृत्तसंस्था |

इंग्लंडचा संघ फिफा विश्वचषक जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याच्या निर्धाराने अमेरिकेत दाखल झाला. परंतु, कॅन्सस सिटीमध्ये इंग्लंडचे खेळाडू सराव सुरू करण्यापूर्वीच एका व्हॅनमधून त्यांचे मॅच बूट चोरण्यात आले. संघातील सर्वात मोठ्या स्टार खेळाडूंचे बूट, अधिकृत स्पर्धेचे चेंडू आणि महत्त्वाचे प्रशिक्षण साहित्य चोरीला गेले आहेत. फ्लोरिडातील वेस्ट पाम बीच येथून इंग्लंडच्या मिसूरीमधील स्वोप सॉकर व्हिलेज येथील सराव सत्राकडे साहित्य नेत असताना ही चोरी झाली. उरलेल्या साहित्यामध्ये फक्त एकच फुटबॉल शिल्लक राहिला आहे. हॅरी केन आणि ज्यूड बेलिंगहॅम यांच्यासारख्या खेळाडूंचे बूटही गायब झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. मिसूरी पोलीस विभागाने सांगितले की, कॅन्सस सिटीमध्ये आलेल्या एका पथकाच्या वाहनातून काही वस्तू गहाळ झाल्या होत्या, त्या वाहनातून उपकरणांच्या संभाव्य चोरीचा आम्ही तपास करत आहोत. दरम्यान, किट पोहोचवण्यासाठी ज्या चालकांवर त्यांनी विश्वास ठेवला होता, त्यांचा या प्रकरणात सहभाग असू शकतो,असा सुरक्षा कर्मचाऱ्यांना संशय आहे.

# द्रविडच्या मुलाची भारतीय संघात निवड

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेटचे दिग्गज फलंदाज राहुल द्रविड यांचा लहान मुलगा अन्वय द्रविड याला भारतीय अंडर-१९ संघात स्थान मिळाले आहे. बीसीसीआयने दि.४ जुलैपासून सुरू होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यासाठी संघाची घोषणा केली असून, यामध्ये अन्वय द्रविडच्या नावाचाही समावेश आहे. या दौऱ्यात भारतीय संघ तीन एकदिवसीय आणि दोन बहु-दिवसीय सामने खेळणार आहे. बीसीसीआयच्या ज्युनिअर क्रिकेट समितीने श्रीलंका दौऱ्यासाठी भारताच्या पुरुष अंडर-१९ संघाची घोषणा केली. या संघाचे कर्णधारपद यशवर्धन सिंह चौहान याच्याकडे सोपवण्यात आले आहे, तर लक्ष्य रायचंदानी याला उपकर्णधार बनवण्यात आले आहे. अन्वय द्रविडचा एकदिवसीय संघात यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून समावेश करण्यात आला आहे. रजत बघेलसह तो संघातील दोन यष्टीरक्षकांच्या पर्यायांपैकी एक असेल. दुसरीकडे, बहु-दिवसीय सामन्यांसाठी मानव कृष्णा आणि आर्यन संदेश सकपाल यांची यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. १७ वर्षीय अन्वयने नुकतेच 'विनू मांकड ट्रॉफी'मध्ये कर्नाटक अंडर-१९ संघाचे नेतृत्व केले होते. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने उपांत्यपूव फेरीपर्यंत मजल मारली होती.

इंग्लंड दौऱ्यादरम्यान घेतला निर्णय | न्युझीलंडसह जगभरातील चाहत्यांना धक्का

# केन विलियम्सनची तडकाफडकी निवृत्ती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

स्टीव्ह स्मिथ, विराट कोहली, जो रूट आणि केन विलियम्सन यामधील एका ताऱ्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये निवृत्ती घेण्याचा निर्णय जाहीर केला. कसोटी, एक दिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये न्यूझीलंड संघाला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून देणारा महान फलंदाज केन विलियम्सन याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली. केनने १६ वर्षांच्या क्रिकेट कारकीर्दित ३७८ आंतरराष्ट्रीय सामना खेळले आहेत. न्यूझीलंडचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे आणि दौरा सुरू असतानाच केनच्या



या निर्णयाने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

इंग्लंड दौऱ्यावरील पहिल्या सामन्यातील पराभवानंतर न्यूझीलंडचा संघ ०-१ असा पिछाडीवर आहे. तो या मालिकेत पुढे सहभागी होणार नाही आणि लॉर्ड्सवरील कसोटी हा त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना ठरला. तो म्हणाला की, ''मी याबद्दल बराच काळ विचार करत होतो, परंतु गेल्या काही दिवसांत मला जाणवले की हीच योग्य वेळ आहे. मी नेहमीच देशासाठी माझे १०० टक्के योगदान दिले आहे. न्यूझीलंड क्रिकेटचे भविष्य उज्ज्वल आहे आणि या संघाचा भाग असल्याचा मला अभिमान आहे. मी माझ्या स्वतःच्या अटींवर निवृत्त होत आहे, हे माझे भाग्य आहे. हा संघ ज्या दिशेने वाटचाल करत आहे, त्याबद्दल मी आशावादी आहे, असेही केन म्हणाला.

केनने ११० कसोटी सामन्यांत ५४.०६ च्या सरासरीने ९५१५ धावा करताना ३३ शतकं व ३८ अर्धशतकं झळकावली आहेत. १७५ एकदिवसीय सामन्यांत त्याच्या नावावर ७२५६ धावांसह १५ शतकं व ४७ अर्धशतकं आहेत, तर ९३ टी-२० सामन्यांत त्याने २५७५ धावा केल्या आहेत. त्याने २०१६-२०२४ या सुवर्णकाळात न्यूझीलंड संघाचे तिन्ही फॉरमॅटमध्ये नेतृत्व केले, ज्या दरम्यान संघाने विश्वचषक स्पर्धेच्या दोन फायनल्स, तीन उपांत्य सामने खेळले. २०२१ मध्ये पहिल्या आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्याला २०१५ चा आयसीसी सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू आणि २०१९ चा सर्वोत्कृष्ट कसोटीपटू म्हणून गौरविण्यात आले. तसेच विक्रमी चार वेळा सर रिचर्ड हॅडली पदक जिंकण्याचा पराक्रमही त्याने केला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)